रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २२९
www.ramprahar.com

गुरुवार, ६ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## 'संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारणार'

**मुंबई :** संगमेश्वर येथील ज्या सरदेसाई यांच्या वाड्याजवळ छत्रपती संभाजी महाराजांना पकडण्यात आले त्याठिकाणी छत्रपती संभाजी महाराजांचे यथोचित स्मारक उभारण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेमध्ये सांगितले. सदस्य निरंजन डावखरे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या वेळी चर्चेमध्ये सदस्य प्रवीण दरेकर, प्रसाद लाड आदींनी सहभाग घेतला. संगमेश्वर येथील सरदेसाई यांच्या वाड्याची जागा कमी पडत असल्यास या स्मारकासाठी नजिकची आणखी काही जमीन अधिग्रहित करण्यात येईल असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज हे स्वराज्य रक्षक, शूर सेनापती, शौर्याचे प्रतिक होते. त्यांच्या पराक्रमाला साजेल असे स्मारक उभारण्याचा मानस आहे.



अंतरंग

'राज्यात कामगारांसाठी नाका शेडची उभारणी'/२

हवामान बदलाने आंबा उत्पादन घटले/६

स्टीव्ह स्मिथची तडकाफडकी निवृत्ती/८

# नैना प्रकल्पातील शेतकऱ्यांना सुधार शुल्क कमी केल्याने दिलासा

## आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नांना यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र म्हणजेच नैना प्रकल्पातील शेतकऱ्यांकडून भूखंडाच्या वाढीव मूल्यांच्या कमाल ५० टक्के सुधार शुल्क (बेटरमेंट चार्जेस) आकारले जाणार होते, परंतु शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी आग्रही भूमिका घेत अत्यल्प सुधार शुल्क करण्याची पुनर्मागणी केली होती. त्या अनुषंगाने सोमवारी (दि.३) झालेल्या सिडको संचालक मंडळाच्या बैठकीत सुधारित शुल्क ०.०५ टक्के एवढे आकारण्याच्या प्रस्तावला मंजूरी झाली आहे. या निर्णयाने नैना प्रकल्पातील शेतकऱ्यांना आणि विकसकांना मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच नैना क्षेत्रातील रखडलेल्या पायाभूत सुविधांच्या कामांना लवकरच वेग मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.



ग्रामस्थांचे जोपर्यंत्त समाधान होत नाही तोपर्यंत नैना प्रकल्पाला सहकार्य करणार नाही, शेतकऱ्यांचे हित जपूनच प्रकल्पाचे काम सुरू करा अशी रोखठोक भूमिका पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर व उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांनी घेतली आणि त्यानुसार शेतकऱ्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडण्याचे काम त्यांनी केले. त्या अनुषंगाने ३ जानेवारीला आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोला पत्र देऊन तातडीने बैठकीचे आयोजन करण्याची मागणी केली होती. त्याप्रमाणे ६ जानेवारीला सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्यासोबत आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांची सिडको कार्यालयात बैठक झाली होती.

या वेळी बेटरमेंट चार्जेस अत्यल्प करणे, ४०-६० धोरण ऐवजी ५०-५० असे प्रमाण करावे, ४२ गावातील ५०३८ घरे/बांधकामावर तोडक कारवाईचा अपप्रचार, शेतकऱ्यांना त्यांच्याच जागेवर भूखंड द्यावेत यासह शेतकऱ्यांच्या इतर प्रश्नावर जोर देत आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी प्रथम शेतकऱ्यांना न्याय त्यानंतर पुढील कार्यवाही करा अशी सूचना वजा मागणी या बैठकीत केली. (पान २ वर..)

# वाढवण बंदर, नवी मुंबई विमानतळामुळे उद्योगांना चालना -राज्यपाल राधाकृष्णन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई जवळ होत असलेले वाढवण बंदर तसेच नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था मोठ्या उंचीवर जाईल व त्यातून सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना मोठी चालना मिळेल, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

'विकसित भारतासाठी लघु - मध्यम उद्योग क्षेत्राचा शाश्वत विकास' या विषयावरील शिखर परिषदेचे उद्घाटन राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि. ५) मुंबईत झाले, त्यावेळी ते बोलत होते. परिषदेचे आयोजन महाराष्ट्र इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट असोसिएशन आणि SME चेंबर ऑफ इंडिया यांनी केले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताला ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्यात लघु व मध्यम उद्योगांचे योगदान महत्वाचे राहील. मोठे उद्योग, लघु उद्योग तसेच सूक्ष्म उद्योग परस्परांना



पूरक असतात त्यामुळे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग वाढले तर त्यांनी मोठ्या उद्योगांनादेखील मदत होईल, असे राज्यपालांनी सांगितले.

विकसित भारताचे लक्ष गाठण्यासाठी देशातील प्रत्येक व्यक्तीला आपले योगदान देणे आवश्यक आहे. जपानच्या प्रगतीमध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे योगदान फार मोठे आहे. औद्योगिक विकासात लघु आणि मध्यम उद्योगांची भूमिका अतिशय महत्वाची असून या दृष्टीने SME चेंबर लघु उद्योगांना सक्षम करण्याचे उत्तम कार्य करीत आहे.

राज्यपालांच्या हस्ते या वेळी राज्यातील विविध लघु आणि मध्यम उद्योगांना २३ वे इंडिया SME उत्कृष्टता पुरस्कार आणि १४ वे प्राइड ऑफ महाराष्ट्र पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते राष्ट्रीय लघु व माध्यम उद्योग उत्पादकता अभियान, SME टीव्ही आणि SME लीगल सेलचे उद्घाटन करण्यात आले.

महाराष्ट्र इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट असोसिएशनने आपल्या रौप्य महोत्सवी स्थापना दिवसानिमित्त तसेच SME चेंबर ऑफ इंडियाच्या ३२वा स्थापना दिनानिमीत्त या परिषदेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाला SME चेंबरचे अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, एएचआय मीडिया लॅबोरेटरीजचे अध्यक्ष डॉ. जी. एम. वारके, MIDAचे मुख्य सल्लागार मोहन राठोड, उपाध्यक्ष सुदेश वैद्य, एल अँड टी-सुफिन लिमिटेडचे भद्रेश पाठक यांसह उद्योजक व महिला उद्योजक उपस्थित होते.

# अबू आझमींचे अधिवेशन संपेपर्यंत निलंबन

## औरंगजेबाचे उदात्तीकरण भोवले

**मुंबई : प्रतिनिधी**


औरंगजेबाचे उदात्तीकरण करणारे वक्तव्य करणारे समाजवादी पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आणि आमदार अबू आझमी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या तारखेपर्यंत त्यांचे निलंबित करण्याचा प्रस्ताव बुधवारी (दि.५) विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आला.

विधानसभेत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अबू आझमी यांच्या निलंबनाचा प्रस्ताव मांडला. अबू आझमी यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना औरंगजेब उत्तम प्रशासक होता, असे त्याची भलामण करणारे आणि छत्रपती संभाजी महाराजांबाबत वादग्रस्त वक्तव्य केले. ही त्यांची वक्तव्ये आक्षेपार्ह आहेत. त्यांची वक्तव्ये निषेधार्ह आहेत. यामुळे सभागृहाचा अवमान झाला. अबू आझमींनी विधानसभेची प्रतिमा मलीन केली. त्यामुळे अबू आझमी यांचे सदस्यत्व अर्थसंकल्प अधिवेशनाच्या शेवटच्या तारखेपर्यंत निलंबन करावे, असा प्रस्ताव मांडला.

# राज्यातील प्रतिज्ञापत्रांचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

विविध प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी नागरिकांना मोठा खर्च करावा लागत होता. तो खर्चच आता राज्य सरकारने थांबविला आहे. विविध प्रकारची प्रमाणपत्रे काढण्यासाठी प्रत्येक अर्जासोबत नागरिकांना ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क जोडावे लागत होते. ते आता रद्द करण्यात आले आहे. यामुळे महागाईने पिचलेल्या जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे.



जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र यासह शासकीय कार्यालयात दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात घेण्यात आल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केले आहे.

आतापर्यंत सर्व प्रमाणपत्रांसाठी किमान ३ ते ४ हजारांचा खर्च पालकांना लागायचा. यापुढे कसलेही मुद्रांक शुल्क न भरता केवळ स्वसाक्षांकित अर्ज लिहून तहसील कार्यालयातून प्रमाणपत्र मिळू शकणार आहेत. त्यामुळे दरवेळी पालकांचा होणारा ३ ते ४ हजारांचा खर्च इथून पुढे होणार नाही. केवळ शैक्षणिकच नाही तर इतर अनेक कारणांसाठी प्रतिज्ञापत्र दाखल करताना ही सर्व प्रमाणपत्रे वेळोवेळी लागत असतात. त्यामुळे हा निर्णय राज्यातील कोट्यवधी नागरिकांसाठी लाभदायी असणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करण्याचे निर्देश मी महसूल खात्याच्या वतीने प्रशासनाला दिले आहेत, असे बावनकुळे यांनी एक्स अकाऊंटवर पोस्ट करत जाहीर केले आहे.

## निवडक

### मंत्री माणिकराव कोकाटेंच्या शिक्षेला कोर्टाकडून स्थगिती

**नाशिक :** मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आली आहे. नाशिक सत्र न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. कोकाटे यांच्यावर ३० वर्षांपूर्वी सदनिका लाटल्याचा आरोप होता. त्याचसंदर्भातील केस कोर्टात सुरू होती. कोर्टाने त्यांना दोन वर्षांची शिक्षा आणि दंड ठोठावला होता, मात्र यासंदर्भात त्यांनी कोर्टात याचिका दाखल केली होती.


### बीडमध्ये आकाशातून पडले दगड, गावकरी भयभीत

**बीड :** वडवणी तालुक्यातील लिमगावात आकाशामध्ये तीन मोठे आवाज होऊन आकाशामधून दगड कोसळले. यातील एक इतक्या वेगाने पडला की घरावरील पत्रा तुटून दगड खाली पडला. अन्य दोन दगड इतर शेतामध्ये पडले, अशी माहिती गावकऱ्यांनी दिली आली आहे. तहसील प्रशासनाने हे दगड ताब्यात घेतले आहेत. तसेच छत्रपती संभाजी नगर येथील भूवैज्ञानिकांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली आहे.



# मोदी सरकारची केदारनाथ रोप वे प्रकल्पाला मंजुरी

## ८ ते ९ तासांचा प्रवास अवघ्या ३६ मिनिटांत



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चार धाममधील महत्त्वाचे धाम असलेल्या केदारनाथ येथे जाण्यासाठी रोप वे बनवण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला आहे. राष्ट्रीय रोप वे विकास कार्यक्रमांच्या पर्वतमाला परियोजनेअंतर्गत उत्तराखंडमधील सोनप्रयाग ते केदारनाथ दरम्यानच्या १२.९ किमी लांबीच्या रोप वे प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली, अशी माहिती बुधवारी (दि.५) केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

या रोपचा मोठा फायदा होईल. यामुळे ८ ते ९ तासांचा प्रवास अवघ्या ३६ मिनिटांत होईल. त्यात ३६ लोक बसण्याची क्षमता असेल. १२.९ किमी लांबीचा हा प्रकल्प असून यासाठी ४,०८१ कोटी खर्च येईल. त्यासाठी मंजुरी दिली आहे, असे वैष्णव म्हणाले.

हा प्रकल्प डिझाइन, बिल्ड, फायनान्स, ऑपरेट आणि ट्रान्सफर तत्वावर विकसित केला जाणार आहे. हा रोप वे प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारीत विकसित करण्याचे नियोजन आहे. तो सर्वात अत्याधुनिक ट्राय-केबल डिटेचेबल गोंडोला तंत्रज्ञानावर आधारित असेल. याची क्षमता प्रति तास प्रति दिशा १,८०० प्रवासी आणि दररोज १८ हजार प्रवासी वाहून नेण्याची असेल.

केदारनाथला दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी हा रोप वे प्रकल्प एक वरदान ठरणार आहे. कारण यामुळे आरामदायी आणि जलद कनेक्टिव्हिटी मिळेल तसेच एका दिशेने प्रवासाचा वेळ सुमारे ८ ते ९ तासांवरून सुमारे ३६ मिनिटे असेल, असे सांगण्यात आले आहे.

## शीव-पनवेल मार्गावर आज वाहतूक बदल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शीव-पनवेल राज्य महामार्गावरील सानपाडा येथील पादचारी पुलास महिन्याभरापूर्वी एका डंपरने धडक दिली होती. यात पूलाचे नुकसान झाले. त्यामुळे या पुलाच्या दुरुस्तीचे काम राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ६ मार्चला हाती घेण्यात येणार आहे. म्हणून या पादचारी पुलाखालून होणाऱ्या वाहतुकीमध्ये बदल करण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वाहतूक पोलिसांनी घेतला आहे.

काम पूर्ण झाल्यानंतर येथील वाहतूक सुरळीत होणार आहे. पुलाच्या कामासाठी ६ मार्चला रात्री ११ ते ७ मार्च सकाळी ६ वाजेपर्यंत येथे वाहतूक बदल लागू करण्यात आले आहे. त्यानुसार, वाशी येथून पनवेलच्या दिशेने जाणारी वाहतूक पाम बीच मार्गे वळवून पुन्हा शीव पनवेल मार्गावरून केली जाणारी असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# रायगड जिल्हा रुग्णालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या नुतन इमारतीचे भुमिपूजन बुधवारी (दि. ५) आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्योग मंत्री उदय सामंत, रोजगार हमी योजन मंत्री भारत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार संजय बांगर, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, डॉ. अंबादास देवमाने आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

या नवीन इमारतील दिडशे कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. दोन लाख चौरस फुटाची सात मजल्यांची सुसज्ज इमारत बांधली जाणार असून. ३०० खाटांच्या या नवीन इमारती साठी पहिल्या टप्प्यात १५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असणार आहे.

केंद्राच्या नियमानुसार पब्लिक हेल्थ सेंटरच्या मान्यतेनुसार खाजगी पद्धतीचे अद्यावत असे बांधकाम केले जाणार आहे. अपघात विभागसाठी स्वतंत्र शस्त्रक्रिया कक्षाही उभारला जाणार आहे.

इमारतीत पाच अत्याधुनिक यंत्र सामुग्रीसह शस्त्रक्रिया कक्ष ही बांधले जाणार आहेत. एचआयव्ही, एचएसबी बधितासाठीही वेगळे शस्त्रक्रिया कक्ष असणार आहे. त्यामुळे नागरिकांना अद्यावत, असे जिल्हा रुग्णालय मिळणार असून उत्तम आरोग्य सुविधा मिळणार आहे.

# भाजपतर्फे स्मार्ट टीव्ही आणि रेंजर सायकल सवलतीच्या दरात

## विचुंबे येथे उपक्रमाचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना ५ ते २० मार्चपर्यंत स्मार्ट एलईडी टीव्ही आणि रेंजर सायकल ५० टक्के सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आले आहे. विचुंबे येथे सुरू झालेल्या या उपक्रमाचे उद्घाटन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि.५) झाले.

या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भुपेंद्र पाटील, चिटणीस यतीन पाटील, माजी जि. प.सदस्य अमित जाधव, विचुंबेचे सरपंच प्रमोद भिंगारकर, माजी सरपंच बळीराम पाटील, श्याम पाटील, विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, उपसरपंच संदीप वाघमारे, सदस्य के.डी.वाघमारे, आप्पा गायकवाड, चेतन सुरते, अभय गोंधळी आदी उपस्थित होते.



विचुंबे ग्रामपंचायती समोर हा उपक्रम सुरू झाला आहे. तंत्रज्ञानाच्या युगात इलेक्ट्रॉनिक्स उपकरण जीवनाचा भाग झाला आहे. ब्लॅक अँड व्हाईट टीव्ही, कलर टीव्ही, एलसीडी त्यानंतर अधिक स्पष्टतेसाठी एलईडी असे तंत्रज्ञान बदल घडत गेले. त्याचप्रमाणे शरीर आणि आरोग्याच्या दृष्टिकोनातून सायकलचा वापर वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर या वस्तू नागरिकांना कमी दरात मिळाव्यात यासाठी ५० टक्के सवलत ही योजना राबवली आहे. त्याचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# अलिबागच्या समुद्रकिनारी आढळली ऑलिव्ह रिडले कासवाची अंडी

**अलिबाग : प्रतिनिधी**

दुर्मिळ होत चाललेल्या ऑलिव्ह रिडले जातीच्या कासवाने किहिम समुद्रकिनारी अंडी घातली आहेत. मंगळवारी (दि.४) अंडी घातल्यानंतर मादी कासव समुद्रात निघून गेले. या अंड्याचे योग्य पद्धतीने जतन करण्यासाठी कांदळवन कक्षाने उपाययोजना आखण्यास सुरुवात केली आहे. किहिम ग्रामपंचायतीने अंडी घातलेल्या ठिकाणी संरक्षण कुंपण घातले असून २४ तास येथे पाहरेकरी ठेवण्यात येणार आहेत. अंडी उबवण्यासाठी साधारण ५० ते ५३ दिवसांचा कालावधी लागणार आहे, पिल्ले बाहेर निघण्याचा क्षण आनंदोत्सव म्हणून साजरा केला जाणार आहे.



> **प्रदूषण नियंत्रीत करण्यासाठी केलेल्या प्रयत्नामुळे येथील प्रदूषण कमी होत आहे, हे या घटनेने दिसून आले. रायगडात नागरिकांना कुठे कासवांची अंडी व घरटी दिसल्यास त्यांनी वनविभाग कांदळवन विभागाला संपर्क साधावा. जेणेकरून कासवांचे संरक्षण करता येईल.**
> **-समीर शिंदे, वनक्षेत्रपाल, कांदळवन कक्ष, अलिबाग**


मुंबईच्या समुद्र किनाऱ्यावर वाढत्या प्रदूषणामुळे ऑलिव्ह रिडले जातीच्या कासवाची घरटी नामशेष झाली आहेत, तर अलिबागच्या समुद्र किनाऱ्यावर ४० वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर अलिबागच्या समुद्र किनारी ऑलिव्ह रिडले जातीच्या कासवांनी अंडी घातल्याचे आढळून आले. या कासवांना हा समुद्रकिनारा आता सुरक्षित वाटू लागला असल्याचे कांदळवन कक्षाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. विभागीय वन अधिकारी दक्षिण कोकण कांदळवन कांचन पवार, सहाय्यक वनसंरक्षण दक्षिण कोकण कांदळवन प्रियांका पाटील, अलिबाग कांदळवन कक्षाचे वनक्षेत्रपाल समीर शिंदे यांच्यासह किहीम ग्रामपंचायतीचे सरपंच प्रसाद गायकवाड यांनी प्रत्यक्ष ठिकाणावर जाऊन पहाणी केली.

वनविभागाच्या कांदळवन कक्षाने या अंड्यांच्या संरक्षणासाठी सर्वतोपरी उपाययोजना आखल्या आहेत. (पान २ वर..)

# राज्यात कामगारांसाठी 'नाका शेड'ची उभारणी करणार -मंत्री आकाश फुंडकर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात मोठ्या शहरांप्रमाणेच छोट्या शहरांमध्ये नाक्यांवर कामगार मोठ्या प्रमाणावर असतात. नाक्यावर थांबून आपल्या कामासाठी जाणाऱ्या कामगारांना बसण्यासाठी शेडची आवश्यकता असते. अशा ठिकाणी जागेची उपलब्धता तपासून नाका शेडची उभारणी करण्यात येईल, अशी माहिती कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.



बांधकाम कामगारांच्या मागण्यांबाबत सदस्य सत्यजित देशमुख यांच्या प्रश्नाला कामगार मंत्री फुंडकर यांनी उत्तर दिले.या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य भास्कर जाधव,अमित देशमुख, राम कदम, विकास ठाकरे, योगेश सागर, अतुल भातखळकर यांनी सहभाग घेतला.

राज्य शासनामार्फत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या माध्यमातून त्यांचे जीवनमान अधिक सुकर करण्यासाठी या योजना अधिक गतिमान पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचे सांगत कामगार मंत्री फुंडकर म्हणाले, बांधकाम कामगारांची नोंदणी जलदगतीने होण्यासाठी प्रत्येक तालुक्यात सेतू केंद्रावर व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी बांधकाम कामगाराच्या कागदपत्रांची केवळ पडताळणी करण्यात येते. सध्या मंडळाकडून ३२ विविध प्रकारच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनांपासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, याची काळजी शासन घेत आहे.

बांधकाम कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यावर विशेष भर दिला जात आहे. बांधकाम कामगारांच्या मृत्यू, अपघात आणि विमा लाभांसाठी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे अशा लाभांची प्रक्रिया एका महिन्यात पूर्ण होईल आणि संबंधित कुटुंबियांना आर्थिक मदत वेळेत मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

बांधकाम कामगारांना घरकुल वाटप गतीने करण्यात येईल. या प्रक्रियेत बदल करून प्रत्येक पात्र बांधकाम करणारा घरकुलाचा लाभ मिळेल. बांधकाम कामगार घरकुल लाभार्थ्यांची यादी ग्रामसभेसमोर ठेवण्याबाबत शासनाचा विचार आहे. माध्यान भोजन योजना बंद करण्यात आली आहे. याबाबत नेमलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर योजनेला पर्याय शोधण्यात येईल.

बांधकामाच्या ठिकाणी पाळणाघर उभारण्याची आवश्यकता असलेली ठिकाणे निश्चित करण्यात येत आहे. आवश्यकता असलेल्या ठिकाणी पाळणाघर देण्यात येणार आहे. कामगारांना ईएसआय रुग्णालयात उपलब्ध होत असलेल्या आरोग्य सेवा प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आदी ठिकाणी कामगारांना विशेषत्वाने आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासन कार्यवाही करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## गोवंश मांसाची अवैध वाहतूक करणाऱ्या चार जणांना अटक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालाच्या हद्दीतून प्रतिबंध गोवंश मांसाची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या चार आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.अजहर इलाईस शहा, अब्दुल समद जावेद कुरेशी झाकीर निसार पठाण आणि नानु कुरेशी अशी अटक केल्या आरोपींची नावे आहेत.महाराष्ट्रामध्ये गोवंश हत्येस प्रतिबंध असतांना हे आरोपी गोवंश मांस अवैधरित्या वाहतूक करून घेऊन जात असताना त्यांना पोलिसांनी नेरूळ आणि वाशी येथे पकडले. कुरेशी संगमनेर येथून भायखळा येथे हे मांस विक्रीसाठी घेवून जात होता. त्याला नेरूळ उड्डाणपुलाच्या खाली अटक करण्यात आली. त्याच्या गाडीत सुमारे ८०० किलो मांस होते.

अन्य एका गुन्ह्यामध्ये पोलिसांनी वाशी टोल नाका येथे सापळा रचून कुरेशी याच्या गाडीतून प्रतिबंध ४०० किलो गोवंश मांस जप्त केले. तो हे मांस गोवंडी येथे विक्रीसाठी घेवून जात होता.

## अनधिकृत बांधकामामुळे 'ज्योती स्टील'वर गुन्हा दाखल

**खोपोली : बातमीदार**

बांधकाम मंजूर नकाशाच्या अनुसार न करता व कुठल्याही सक्षम प्राधिकरणाकडून भोगवटा प्रमाणपत्र न घेतल्याने तालुक्यातील ज्योती स्टील इंडस्ट्रीज प्रा.लि.,होनाड, विरोधात महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम अंतर्गत खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

ज्योती स्टील इंडस्ट्रीज प्रा.लि.,होनाड, ता.खालापूर येथे सर्व्हे नंबर १०/१, १०/३, १०/४, १०/६, १०/११ व १९/८ या जमिनीवर कारखान्याचे वापराकरिता सुरक्षा चौकी,स्वच्छता गृह, पाण्याची टाकी, सह गोडाऊन अशा एकूण १७ ठिकाणी अनधिकृत बांधकाम मंजूर नकाशाच्या अनुसार न करता व कुठल्याही सक्षम प्राधिकरणाकडून भोगवटा प्रमाणपत्र न घेता केल्याचे आढळून आले. गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## महिला मिनी मॅरेथॉन देणार स्वच्छतेचा संदेश

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ शहराचा बहुमान वाढविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेस विविध संस्थांचेही महत्वपूर्ण योगदान लाभत असते. अशाच प्रकारचा 'रन फॉर क्लिन नवी मुंबई (चला धावूया स्वच्छ नवी मुंबईसाठी)' हा एक अभिनव उपक्रम जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च रोजी नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहयोगाने डॉ. डी वाय पाटील डिम्ड टू बी युनिव्हर्सिटी ऑफ हॉस्पिटॅलिटी ण्ड टुरिजम स्टडिज यांच्या वतीने 'घे भरारी' शिर्षकांतर्गत राबविण्यात येत आहे.

८ मार्च २०२५ रोजी, सकाळी ६.३० वाजता, सायन पनवेल महामार्गा नजिकच्या सर्व्हीस रोडवर असलेल्या डॉ. डी. वाय पाटील स्टेडियमच्या मुख्य प्रवेशव्दारापासून या महिला मिनी मॅरेथॉनला प्रारंभ होणार असून ५ कि.मी. अंतराच्या या मिनी मॅरेथॉनमध्ये विविध वयोगटातील महिला सहभागी होऊ शकतात.

स्वच्छतेचा संदेश प्रसारित करीत धावणारी ही मिनी मॅरेथॉन धावण्याचे महत्व अधोरेखीत करीत आरोग्यपूर्ण जीवनाची गरजही सांगणार आहे.

## निजामपूर विभागाला भीरा धरणाचे पाणी मिळण्याची मागणी; टंचाईवर होऊ शकते मात

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील निजामपूर विभागाला भीरा धरणाचे पाणी पुरवठा झाल्यास या भागातील पाणी टंचाईवर मात होऊन येथील दुष्काळी परिस्थिती नियंत्रणात येऊ शकते. या पाण्याचा मोठा वापर टाटा पॉवर वीज प्रकल्पांसाठी तर उर्वरित पाणी कुडलिका नदीत सोडण्यात येत आहे. याच पाण्याचा ५० टक्के हिस्सा निजामपूर विभागाला देण्यात यावे अशी मागणी निजामपूर विभागातील हजारो शेतकरी आणि ग्रामस्थांनी केली आहे.

कुंडलिका नदीला भीरा धरणामधून बॅकवॉटर स्वरूपात पाणी येते, ज्याचा मोठा भाग टाटा पॉवरसाठी वापरला जातो. मात्र, याच पाण्याचा काही हिस्सा जर निजामपूर गावाला पुरवला गेला, तर गावातील पाण्याची तीव्र टंचाई काही प्रमाणात कमी होऊ शकते.

गेल्या काही वर्षांपासून निजामपूर गाव दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करत आहे. स्थानिक जलस्रोत आटले असून, शेती व पिण्यासाठी आवश्यक पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. दुसरीकडे, भीरा धरणातून येणारे पाणी कुंडलिका नदीतून प्रवाहित होते आणि त्याचा उपयोग मुख्यतः औद्योगिक कारणांसाठी केला जातो. या धरणातून ५.३६ दशलक्ष घनमीटर पाणी सोडण्यात येत आहे.

गावकऱ्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, भीरा धरणातून कुंडलिका नदीत येणाऱ्या पाण्याचा काही भाग निजामपूर विभागातील गावांसाठी वळवण्यात यावा. यामुळे पिण्याच्या पाण्यासोबतच शेतीसाठीही पाणी मिळू शकते आणि दुष्काळी स्थिती थोडीफार तरी सुधारू शकते.

याबाबत प्रशासनाकडून अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

स्थानिक पातळीवर जलसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन केल्यास आणि औद्योगिक पाण्याच्या वितरणात थोडा समतोल साधल्यास, निजामपूरसह परिसरातील इतर गावांनाही दिलासा मिळू शकतो. याबाबत स्थानिक प्रशासन आणि टाटा पॉवर यांच्यात त्वरित चर्चा होणे गरजेचे आहे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

याच भागात केळगण-कुंभे धरणाचे काम गेली ५० वर्षापासून रखडले आहे. या धरणातील पाणी महाड आणि माणगाव तालुक्यातील निजामपूर भागाला मिळणार होते. आता तीही शक्यता मावळली आहे. या धरणाचे काम सुरू करण्यासाठी रोहीयो मंत्री भरत गोगावले यांनी ६६० कोटी रुपये मंजूर केले आहेत. अद्यापही काम सुरू झालेले नाही. उन्हाळ्यात हा सुमारे १०० गावांचा परीसर पिण्याच्या पाण्यावीना तडफडत असतो. या भागात पाणी टंचाई जाणवत असल्याने निजामपूर भागाचा शाश्वत विकास खुंटला आहे. रोजगार नसल्याने येथील तरुण मुंबई आणि पुणे या शहरात नोकरीसाठी स्थलांतरित झालेला पहावयास मिळत आहे. त्यामुळे या भागात पाणी पुरवठा योजना राबविणे गरजेचे आहे. तसेच भिरा धरणाचे पाणी या भागाला दुबार शेती, भाजीपाला आणि फळफळावळ करता येईल

## अटकावून ठेवलेल्या जप्त वाहनांचा ई-लिलाव

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

मोटार वाहन कर न भरलेल्या वाहनांना मुंबई मोटार वाहन कर अधिनियमांतर्गत जप्त करण्यात आले आहे. जप्त केलेल्या वाहनांच्या वाहन मालकांना थकीत कर भरणा कळविण्यात आल्यानंतर देखील वाहन मालकांनी कर भरलेला नाही. अशा एकूण ४४ वाहनांचा ई-लिलाव दि.७ एप्रिल रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० यावेळेत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल येथे होणार असून सर्व इच्छुकांनी ई-लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घ्यावा, असे आवाहन कराधान प्राधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल जयंत चव्हाण यांनी केले आहे.

ई लिलावाच्या तारखेपर्यंत थकीत करदारांना कर भरण्याची संधी राहील, याची वाहनाच्या मालकांनी, ताबेदारांना, वित्तदात्यांनी लिलावाच्या दिनांकापर्यंत या कार्यालयात थकीत कर, पर्यावरण कर शासकीय दंडाच्या रकमेचा भरणा करून वाहने सोडून न्यावीत किंवा लिलावात हरकत घ्यायची असल्यास दि.१९ मार्च पर्यंत लेखी हरकत घ्यावी. तद्नंतर आपले काही म्हणणे नाही असे गृहीत धरून वाहनांचा लिलाव हा ई-लिलाव पदध्दतीने करण्यात येईल.

ई-लिलाव होणाऱ्या वाहनांची यादी कार्यालयाच्या सूचना फलकांवर माहितीसाठी लावण्यात आली आहे. इच्छुकांनी वाहनांची प्रत्यक्ष पाहणी दि.२४ मार्च रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ पर्यंत वाहन अटकावून, जप्त असलेल्या ठिकाणी संपर्क करावा. अधिक माहितीसाठी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल येथे संपर्क साधावा.

## ६ मार्च रोजी जिल्हास्तरीय पेन्शन अदालत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिहयातील विविध राज्य शासकीय कार्यालयातील आस्थापनेवरील अधिकारी कर्मचारी हे मोठ्या प्रमाणात सन २०२५ ते २०२६मध्ये निवृत्त होणार आहेत किंवा झालेले आहेत. तसेच जिल्हयातील सेवानिवृत्ती प्रकरणे कार्यालयीन स्तरावर तसेच वेतन पडताळणी पथकाकडे व रजा मंजूरीवर प्रलंबित असल्याचे दिसून येत आहेत. त्यासाठी विविध शासकीय कार्यालयातील प्रलंबित सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे जलद गतीने निपटारा करण्याकरिता ६ मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता राजस्व सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग या ठिकाणी जिल्हास्तरीय पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हयातील प्रलंबित असलेल्या सेवानिवृत्त प्रकरणाबाबत संबंधित सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्या कडील आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी केले आहे.

## नेरळ येथील मटका गुन्हे अन्वेषण विभागाकडून उद्ध्वस्त

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी आज मटका जुगार अड्ड्यांवर धडक कारवाई केली. या कारवाई मध्ये स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे स्थानिक गुन्हे शाखा तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उप निरीक्षक अनिल गोसावी, पोलीस उप निरीक्षक लिंगप्पा सरगर, पोलीस उप निरीक्षक गणेश पवार, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक प्रसाद पाटील, सहा. पोलीस उप निरीक्षक संदिप पाटील, पोलीस हवालदार यशवंत झेमसे, राकेश म्हात्रे, सुधीर मोरे, जितेंद्र चव्हाण, अक्षय पाटील, शामराव कराडे, पोलीस शिपाई लालासो वाघमोडे, भरत तांदळे, ओंमकार सोंडकर यांनी केली आहे. नेरळ पोलीस ठाणे येथे सुरू असलेल्या मटका जुगार अड्डा पोलिसांनी उदवस्त केला. सदर कारवाई मध्ये मटका सट्टा खेळण्याचे साहीत्य व रोख रक्कम जप्त करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखा रायगड यांना जिल्हयामध्ये खोपोली, नेरळ, रोहा, तळा इत्यादी ठिकाणी अवैधरित्या मटका सट्टा घेत असल्याची माहिती मिळाली त्यानुसार पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे स्थानिक गुन्हे शाखा रायगड यांनी कारवाइ केली.

## कोकण रेल्वे मार्गावर वंदे भारत एक्स्प्रेसचा अपघात



**टळला, चिपळूण : प्रतिनिधी**

कोकण रेल्वे कारभाराच्या हलगर्जीपणामुळे होणारा मोठा अनर्थ टळला आहे. चिपळूणजवळच असलेल्या कळंबस्ते फाटा येथे फाटक न पडल्याने गोव्याकडून मुंबईकडे रवाना होणारी वंदे भारत एक्स्प्रेस खेर्डी पुलावरच थांबवण्यात आली. ही गाडी हळूहळू हॉर्न देत कळंबस्ते फाटकापर्यंत आणून पुढे मार्गस्थ करण्यात आली.

चिपळूण रेल्वे स्थानकाच्या आधी कळंबस्ते येथे रेल्वे फाटक आहे. येथून मोठ्या प्रमाणात वाहनाची ये जा होत असते. या ठिकाणी असलेल्या फाटकाच्या यंत्रणेत पंधरा दिवसाने पुन्हा एकदा बिघाड होवून फाटक न पडल्याने वंदे भारत एक्स्प्रेस खेर्डी पुलावरच थांबवावी लागली. मागील पंधरा दिवसांत ही दुसरी घटना घडल्याने कोकण रेल्वेच्या कारभाराविरोधात नागरिक व वाहनचालकांमधून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहेत. सुदैवाने यामार्गावरील दुसऱ्या वेळीही होणारा मोठा अनर्थ टळला आहे.

## पान १ वरुन

### नैना प्रकल्पातील शेतकऱ्यांना सुधार शुल्क कमी केल्याने दिलासा

बेटरमेंट चार्जेस कमी करण्यासंदर्भात सिडको स्तरावर सकारात्मक निर्णय घेता येणार आहे, त्यामुळे हा निर्णय तातडीने घेण्यात यावा, अशी मागणी या बैठकीत करण्यात आली होती. त्यानुसार या संदर्भात योग्य निर्णय घेणार असल्याचे सिडकोचे उपाध्यक्ष विजय सिंघल यांनी दोन्ही आमदार महोदयांना आश्वासित केले होते. त्या अनुषंगाने सोमवारी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत सर्व नगर रचना परियोजनामधील सुधार शुल्क कमी करुन शेतकऱ्यांच्या या महत्त्वपूर्ण प्रश्नावर सकारात्मक मार्ग निघाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे.

नैना क्षेत्रातील शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी सिडको व सरकार दरबारी कायम पाठपुरावा केला आहे. सुधार शुल्काचा महत्त्वपूर्ण प्रश्न निकाली लागल्याने शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

### अलिबागच्या समुद्रकिनारी आढळली ऑलिव्ह रिडले कासवाची अंडी

कासवाच्या घरट्याच्या बाजूला कुंपण घालण्यात आले असून तेथे २४ तास पहारेकरी ठेवण्यात येणार असल्याची माहिती वनअधिकाऱ्यांनी दिली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने या घरटाला आणि त्या घरट्यातील अंड्यांचे जतन केले जाणार आहे. येथील काही स्थानिक जुन्या लोकांसोबत बोलल्यानंतर त्यांनी असे सांगितले यापूर्वी तिथे अशाप्रकारे कासव अंडी घालण्यासाठी येत होते, मात्र वाढते प्रदूषण आणि वर्दळीमुळे बरीच वर्ष या किनाऱ्यावर ठिकाणी कासव आलेच नव्हते. प्रदूषण नियंत्रण महामंडळाने किहीम समुद्र किनाऱ्याच्या स्वच्छतेसाठी एक मशीन दिले असून दररोज येथील कचरा उचलला जातो.


नैसर्गिक अधिवास उष्णकटिबंध व शितोष्ण कटिबंध असलेल्या ऑलीव्ह रिडले कासवाच्या मादीचे वजन ५० किलोग्रॅमपर्यंत असते तर लांबी ६० ते ७० सेंटीमीटर असते. त्यांचा वीणीचा हंगाम प्रामुख्याने नोव्हेंबर ते मार्च असा पाच महिन्यांचा असतो.

रात्रीच्या वेळी मादी अंडी घालते. एका वीणीच्या हंगामात २ ते ३ वेळा साधारणतः अंडी घातली जातात. मादी एकावेळी १०० ते २०० अंडी घालते. ४५ ते ५५ दिवसात अंडी नैसर्गिकरित्या उबतात व त्यातून पिल्ले जन्माला येतात.

## भंगार खरेदी टोळ्यांची दहशत, आठ दिवसांत दोन गुन्हे

**नवी मुंबई :रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई लगत असणाऱ्या औद्योगिक वसाहतीमधील हजारो कंपन्यांतून टनांवारी निघणारे भंगार खरेदी करणाऱ्यांची दादागिरी पूर्वीपासून सुरू आहे. आता ही प्रकरणे पोलीस ठाण्यापर्यंत पोहचत आहेत. आठवडाभरात दोन गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामुळे भंगार खरेदी विक्री टोळ्यांची दहशत, त्यातून गुन्हेगारी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.औद्योगिक वसाहतीत साडेतीन चार हजाराच्या घरात लहान-मोठे कारखाने आहेत. त्यातील अनेक कारखान्यांतून ठरावीक दिवसांनी टाकाऊ माल अर्थात भंगार मोठ्या प्रमाणात निघते. भंगार खरेदी विक्रीची वर्षाला कोट्यवधींची उलाढाल होत असते. यात अनेक वर्षांपासून गुन्हेगारी प्रवृत्ती व्यक्तींनी प्रवेश केला आहे.




२४ फेब्रुवारीला ओरिएंटेल विविंड अँड प्रोसेसिंग कंपनीत भंगार खरेदी वरून राडा झाला होता. या कंपनीतील भंगार साहित्य एस. के. एंटरप्राइज नावाच्या भंगार खरेदी करणाऱ्या कंपनीला विकले. हे भंगार ट्रकमध्ये भरून बाहेर नेले जात असताना रुपेश आणि अनिल यांनी काही साथीदारांच्या मदतीने हे ट्रक रोखले. शेवटी एस. के. एंटरप्राइजचे कमाल खान यांच्याकडून साडे नऊ हजार रुपये जबरदस्तीने घेतल्यावर सर्व संशयित निघून गेले.

या प्रकरणी तुर्भे एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा नोंद झाला होता. हे प्रकरण ताजे असतानाच सोमवारी असाच प्रकार घडला. महापे येथील भूखंड क्रमांक ३५२ येथे एक कंपनी असून व्यवसायाने माथाडी कामगार असलेले सूरज शेवाळे हे साथीदारांसह तेथे आले. त्यांनी भंगार सामान दुसऱ्याला का देतात असा जाब विचारला. याचे पर्यवसान हाणामारीत झाले. या प्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दुखवटा

### मनोरमा पाटील

**उरण :** शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख व जेएनपीएचे ट्रस्टी दिनेश पाटील यांच्या मातोश्री मनोरमा काशिनाथ पाटील यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ९२व्या वर्षी निधन झाले. जसखार येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी मंगळवार, ११ मार्च रोजी श्री क्षेत्र माणकेश्वर, केगाव येथे सकाळी ८ वाजता तर दिवसकार्य बुधवार दि. १३ मार्च रोजी राहत्या घरी जसखार येथे होणार आहे.



### निलम ओक

**माणगाव :** प्रसिध्द वकील प्रकाश ओक यांच्या पत्नी निलम ओक व यांचे बुधवारी सकाळी महाड येथे उपचारासाठी नेत असताना दासगाव जवळ हार्टअटॅकने निधन झाले. त्या एस.एस. निकम इंग्लिश मिडियम स्कुलमध्ये संस्कृतच्या शिक्षिका होत्या. त्यांच्या पक्षात एक मुलगा एक मुलगी पती नातवंडे असा परिवार आहे दहावे १४ मार्च रोजी तर उत्तरकार्य १७ मार्च रोजी राहत्या घरी होणार आहे.



## संपादकीय

# जबाबदारीचे भान हवे

'छावा' या चित्रपटाच्या पार्श्वभूमीवर समाजवादी पार्टीचे नेते, आमदार अबू असीम आझमी यांनी औरंगजेबाबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांबद्दल बुधवारी त्यांचे विधानसभेतून अधिवेशनाच्या काळापुरते निलंबन करण्यात आले. अनुभवी राजकीय नेते व विधानसभा सदस्य असलेल्या आझमी यांनी अशा संवेदनशील विषयावर वादग्रस्त विधान करण्याचे टाळायला हवे होते.

**'छावा' चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून महाराष्ट्रातीलच काय, देशभरातील जनतेच्या संबंधित इतिहासाविषयीच्या भावना तीव्र झालेल्या असताना समाजवादी पार्टीचे नेते, आमदार अबू असीम आझमी यांनी मुघल शासक 'औरंगजेब हा क्रूर प्रशासक नव्हता' असे वक्तव्य केले. त्यांच्या या वक्तव्यावर स्वाभाविकपणे अनेकांनी टीकेची झोड उठवली. ठाण्यातील नौपाडा पोलिस ठाण्यात त्यांच्याविरोधात गुन्हाही दाखल करण्यात आला. यापूर्वीही अनेकदा आझमी यांनी वादग्रस्त विधाने केली आहेत. आता तर त्यांनी औरंगजेबाची भलामण करणारे उद्गार काढल्यामुळे वाद उद्भवला आहे. औरंगजेब हा एक उत्कृष्ट प्रशासक होता. त्याच्या पदरी हिंदू सरदारही होते. त्याने भारताच्या सीमा काबूलपासून बंगालपर्यंत नेल्या. तो क्रूरकर्मा नव्हता तर आपल्या राज्याच्या विस्तारासाठी त्याचे मराठ्यांशी युद्ध झाले, अशा आशयाचे उद्गार आझमी यांनी काढले. त्यांच्या वक्तव्यावर लागलीच टीका तर झालीच, खेरीज भारतीय जनता पक्ष व शिवसेना (शिंदे) आमदारांनी या वादग्रस्त विधानांवरून बुधवारी विधानसभेत गोंधळ घातला. विधानसभेबाहेरही आझमी यांच्या विरोधात निदर्शने केली. आझमी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणीही करण्यात आली. अखेर आझमी यांच्या निलंबनाचा प्रस्ताव भाजप आमदार आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मांडला व अधिवेशन संपेपर्यंत आझमी यांचे निलंबन करण्यात आले. अशातऱ्हेची वादग्रस्त विधाने करून आझमी यांनी विधानसभेची प्रतिमा मलीन केली आहे. यामुळे सभागृहाचा अपमान झाला असून ही विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या तारखेपर्यंत त्यांच्या निलंबनाचा ठराव करते, असा ठराव या वेळी मंजूर करण्यात आला. औरंगजेबाने स्वत:च्या बापालाही तुरुंगात टाकले होते. त्याने आपल्या ज्येष्ठ बंधूची हत्या केल्याचे तसेच मुलांचीही गय न केल्याचे उल्लेख इतिहासात आढळतात. अशा औरंगजेबाची भलामण करावेसे आझमी यांना का बरे वाटले असावे? चित्रपटातून चुकीचा इतिहास दाखवला जात आहे. औरंगजेबाने अनेक मंदिरे बनवलेली आहेत. मी औरंगजेबाला क्रूर प्रशासक मानत नाही. छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेब यांच्यातील जी लढाई होती, ती लढाई राज्य कारभाराशी संबंधित होती. ती लढाई कुठेही हिंदू आणि मुस्लिम अशी नव्हती, असे आझमी यांनी म्हटले होते. आपल्या विधानामुळे वाद निर्माण होत असल्याचे दिसताच मात्र त्यांनी आपले म्हणणे तसे नव्हते. या विषयाला राजकीय वळण दिले जात आहे असा दावा करीत, विधान मागे घेत असल्याचा सूरही लावला. परंतु तोवर आझमी यांच्या या वादग्रस्त विधानांचे पडसाद महाराष्ट्राबाहेर उत्तर प्रदेशच्या विधानसभेतही उमटले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी समाजवादी पक्षाचे लोक औरंगजेबाला आपला हिरो मानत असल्याचा हल्लाबोल केला व आझमी यांना चांगलेच सुनावले. समाजवादी पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांनी मात्र आझमी यांची बाजू घेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे नेहमीचे तुणतुणे वाजवले. मतांवर डोळा ठेवून मुघल शासकांची स्तुती करणाऱ्या या नेतेमंडळींना अभिव्यक्ती स्वातंत्र्यासोबत जबाबदारीचे भानही बाळगायचे असते हे कुणीतरी समजावण्याची गरज आहे.**

# कार्यालयीन न्यायव्यवस्था भ्रष्टाचाराच्या गर्तेत

**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यातील तहसिलदार कपिल घोरपडे यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर गेल्या आठवडयापासून तहसिलदार पदाशिवाय तालुक्यातील जनतेच्या कामकाजावर प्रचंड परिणाम झाला आहे. पोलादपूर तालुक्यातील जनतेची कामे होतीलही मात्र, कार्यालयीन न्यायव्यवस्थेच्या या भ्रष्टाचारी परिस्थितीमुळे न्याय विकत मिळतो,हे पुन्हा एकवार स्पष्ट झाले आहे.

माहितीचा अधिकार आणि अपिलकर्ते, शेतजमिनीबाबतची प्रकरणं, कुळकायद्याची प्रकरणं, रेशनकार्ड, अदखलपात्र गुन्ह्यांच्या चॅप्टर केसेस, गौणखनिज उत्खनन, जुने अभिलेख शोधून देणे, जमीनींच्या क्षेत्राच्या कमीजास्तीच्या नोंदी, फेरफार, सातबारा व बिनशेतीप्रकरणं, महसूल वसूल, गावठाणामधील कब्जा नसलेल्या जमिनी, विनापरवाना दुकानांपासूनची दंडात्मक कारवाई, उत्पन्नाचे दाखले, जातीचे दाखले, फलोत्पादन व अन्य योजना, वृक्षतोडीचे परवाने, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील भुसंपादित जमिनींचे रखडलेले मोबदले, जमिनीच्या वाटपपत्रं आणि वारसनोंदी, बिनशेतीच्या रस्त्यांची प्रकरणं, सामाजिक संघटना व धर्मादाय संस्थांची प्रकरणं, धर्मादाय संस्थांच्या मालमत्तांची प्रकरणं व जमिनी अशा विविध कारणास्तव सर्वसामान्य जनतेला तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार हे पद आदराचे आशास्थान असते. पोलादपूर तालुक्यातील वनविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, पंचायत समिती कार्यालय, ग्रामसेवक, तलाठी, पोलीस स्टेशन, रजिस्ट्रार कार्यालय, भूमीअभिलेख कार्यालय, तालुका कृषी विभाग, शिक्षण विभाग, सार्वजनिक वितरण प्रणाली, एकात्मिक बालविकास प्रकल्प,



ग्रामीण रूग्णालय, महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनमार्फत होऊ घातलेली आंबेनळी घाटातील रस्ता रूंदीकरणाची कामे, तालुका सहकार निबंधक वगैरे कार्यालयांचे कुटूंबप्रमुख म्हणून पोलादपूरचे तहसिलदार कपिल घोरपडे यांनी वेगळेच वडीलकीचे नाते प्रस्थापित केले. याखेरीज, थेट जनतेची सेवा करण्याची कामेदेखील त्यांनी तत्परतेने केली. पूरस्थितीमध्ये तसेच आगीच्या घटनांमध्ये समाजसेवकांसोबत धावपळ करण्यासाठी कर्तव्य बजावताना रूग्णवाहिकेसारख्या वाहनांमधून तहसिलदार पोहोचल्याच्या ग्रामीण जनतेच्या चर्चा जनतेच्या आशेतूनच चर्चिल्या गेल्या होत्या.

**तहसिलदारांवर वरपर्यंतची जबाबदारी?**

पोलादपूर तहसिलदार कपिल घोरपडे यांच्यावर वरपर्यंतची जबाबदारी असल्याच्या चर्चा सर्वत्र होत असल्या तरी ज्या घटनेमुळे त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला. ते प्रकरण जमिनीबाबतच्या न्यायनिर्णयाचे होते. जमिनीच्या तफावतीबाबत दावा तक्रारदार यांना अखत्यारपत्र दिलेल्या इसमाने दाखल केला होता. दाव्याचा निर्णय देऊन आदेशाची प्रत देण्याकरिता ३१ जानेवारी २०२५ रोजी तक्रारदार यांचेकडे आरोपी तहसिलदार लोकसेवक कपिल तुकाराम घोरपडे यांनी ३ लाखांच्या लाचेच्या रकमेची मागणी केल्याची तक्रार दि.३ फेब्रुवारी २०२५ रोजी प्राप्त झाली होती. तडजोडीअंती तडजोडी अंती दोन लाख ५० हजार रूपये रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. या तक्रारीनुसार तहसीलदार घोरपडे यांनी लाच मागितल्याची खात्री लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने केली. मात्र ५ फेब्रुवारी २०२५ रोजी व १८ फेब्रुवारी २०२५ रोजी आरोपी लोकसेवक तहसिलदार कपिल घोरपडे यांच्याविरुध्द सापळा लावण्यात आला होता. या पथकाने याप्रकरणी पोलादपूर येथे ठाण मांडून कसोशीने हा सापळा यशस्वी करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे यांना संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही. यामुळे आरोपी लोकसेवक पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे यांच्याविरुध्द पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८चे कलम ७ प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

या घटनेतील फिर्यादीचे वडील पोलादपूर तहसिल कार्यालयातून काही वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत. पोलादपूर तालुक्यात गेल्या दोन वर्षांपासून लोकाभिमुख अधिकारी म्हणून काम केलेल्या तहसिलदार कपिल घोरपडे यांच्याविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. मात्र, वरपर्यंतची जबाबदारी म्हणजे कुठपर्यंतची जबाबदारी आणि लोकसेवक म्हणजे वरपर्यंतची सेवा की लोकप्रतिनिधींच्या सेवेची जबाबदारी याचा अर्थ सद्यस्थितीत लावणे फार सोपे ठरत आहे. कारण उपविभागीय अधिकारी यांनीदेखील स्वत:चे स्थान लोकप्रतिनिधीच्या सेवेत नक्की केले आहे. या सर्वांवर कोणती जबाबदारी आणि कोणी निश्चित केली आहे? या प्रश्नाचे उत्तर सर्वसामान्य जनतेला कोणी कसे द्यावे, याबाबत कोणालाही सोयरसुतक नाही. मात्र, लाच मागण्याचा प्रयत्न जमिनीच्या प्रकरणातील न्यायनिर्णयाबाबत झाल्याने सर्वसामान्य जनतेला कोणी कसा न्याय द्यावा, याबाबत साशंकता नव्हे तर न्याय विकतच मिळतो, ज्याला विकत नको असेल तर त्याला फुकट अन्याय मिळतो, हे निश्चित झाले आहे. स्वत:च्या खात्यातील सेवानिवृत्त अपंग कर्मचाऱ्याच्या मुलाबाबत संवेदनशीलता न दाखविणाऱ्या अधिकाऱ्याबाबत त्या मुलाने घेतलेला पवित्रा निश्चितच कौतुकास्पद आहे

# राष्ट्रीय दंतचिकित्सक दिन

दंतवैद्यांबद्दल कृतज्ञता आणि आभार व्यक्त करण्यासाठी दरवर्षी ६ मार्च रोजी राष्ट्रीय दंतचिकित्सक दिन साजरा केला जातो. स्वच्छ दंतचिकित्सा पद्धतींबद्दल जागरूकता आणण्याचा हा एक मार्ग आहे. हा दिवस मौखिक आरोग्य आणि स्वच्छतेच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्याची आठवण करून देतो. हा दिवस मौखिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी आणि मौखिक आजार रोखण्यासाठी दंतवैद्य आणि दंत व्यावसायिकांच्या योगदानाची दखल घेतो. या दिवसाचे साजरे केल्याने नियमित दंत तपासणी आणि ब्रशिंग आणि फ्लॉसिंगसारख्या मौखिक स्वच्छतेच्या पद्धतींचे महत्त्व देखील अधोरेखित होते.

राष्ट्रीय दंतवैद्य दिन हा मौखिक आरोग्य आणि स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यास मदत करतो म्हणून तो महत्त्वाचा आहे. हा दिवस लोकांना नियमित दंत तपासणी आणि चांगल्या मौखिक स्वच्छतेच्या पद्धतींची आठवण करून देतो. तोंडाच्या आजारांना प्रतिबंधित करण्यात आणि त्यावर उपचार करण्यात दंतवैद्य आणि दंत व्यावसायिकांच्या योगदानाची देखील तो ओळख देतो, जे एखाद्या व्यक्तीच्या एकूण आरोग्यावर आणि कल्याणावर लक्षणीय परिणाम करू शकतात.

हा दिवस दंत संस्था आणि संघटनांना सामान्य लोकांमध्ये चांगल्या मौखिक आरोग्य पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी जागरूकता मोहिमा आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्याची संधी प्रदान करतो. याव्यतिरिक्त, राष्ट्रीय दंतचिकित्सक दिन दंतचिकित्सा क्षेत्रातील करिअर संधींबद्दल जागरूकता वाढविण्यास मदत करू शकतो, तरुणांना या क्षेत्रात करिअर करण्यास प्रोत्साहित करू शकतो.

तुमच्या दंतवैद्याला तुमच्या सुधारित तोंडी आरोग्य पथ्ये आणि चांगल्या दंत सवयींबद्दलची तुमची वचनबद्धता दाखवून त्यांचे कौतुक करा. असे करण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे दंत तपासणीचे वेळापत्रक तयार करणे. तुमच्या दंतवैद्याला तुमच्या तोंडी आरोग्याबद्दल प्रश्न विचारण्याची ही वेळ आहे. तुमचे दात निरोगी आहेत आणि तुमच्या सवयी योग्य मार्गावर आहेत याची खात्री तुम्ही केली पाहिजे.

वैयक्तिक पातळीवर जागरूकता निर्माण करा. जर तुमच्या आजूबाजूला लहान मुले असतील तर त्यांना तोंडाच्या स्वच्छतेच्या चांगल्या सवयी शिकवा आणि कुटुंब आणि मित्रांना त्यांच्या दंतवैद्याकडे जाण्यास प्रोत्साहित करा.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# उन्हाळ्यात मोबाईलचे होतात स्फोट; गॅझेटचे नियम पाळा

सध्या, मोबाईल फोन, इअरबड्स आणि नेक बॅंडसारखे इतर गॅझेट्स आपल्या सर्वांच्या जीवनात महत्त्वाची भूमिका बजावतात, पण कधी-कधी या उपकरणांच्या स्फोटाच्या घटनाही समोर येतात, ज्यामुळे साहजिकच आपल्यालाही भीती वाटते. याबाबतीत आपले गॅझेट्स स्फोट होण्यापासून कसे वाचवायचे त्या संदर्भात दिलेली माहिती कायमस्वरूपी लक्षात ठेवा.



जास्त चार्जिंग टाळा : बरेच जण रात्रभर फोन चार्जिंगला ठेवतात. ही सवय वाईट आहे. स्मार्टफोन, लॅपटॉप आणि इतर कोणतेही गॅझेट जास्त काळ चार्जिंगवर ठेवणे धोकादायक ठरते. असे केल्याने अतिरिक्त चार्जिंगमुळे बॅटरी गरम होऊन तिचा स्फोट होऊ शकतो.


ब्रॅंडेड चार्जरचा वापर : तुमचा फोन, लॅपटॉप किंवा इतर डिव्हाइस चार्ज करण्यासाठी त्याचा मूळ चार्जर वापरा. चार्जर हरवला किंवा खराब झाला असेल तर अशा परिस्थितीत नवीन चार्जर खरेदी करताना ओरिजनल चार्जर घ्या. स्वस्त किंवा नॉन-ब्रॅंडेड चार्जर वापरल्याने बॅटरी उशिरा चार्ज होते, ज्यामुळे स्फोट होऊ शकतो.

बॅटरीच्या गुणवत्तेकडे लक्ष द्या : गॅझेटची बॅटरी वेळोवेळी तपासा. बॅटरीमध्ये काही दोष दिसल्यास, त्याकडे दुर्लक्ष करण्याऐवजी, त्वरित बदला. बऱ्याच वेळा खराब बॅटरी हे यंत्राचा स्फोट होण्याचे कारण असते. डिव्हाइसची बॅटरी जास्त गरम होत असल्यास, ती त्वरित बदला.

डिव्हाइस सुरक्षित ठेवा : तुमच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे अति उष्णता आणि थंडीपासून संरक्षण करा. उन्हात किंवा वाहनाच्या आत ठेवून जाऊ नका. जास्त तापमानामुळे बॅटरी खराब होऊ शकते आणि तिचा स्फोट होऊ शकतो. बॅटरीमध्ये दोष असू शकतात, ज्यामुळे स्फोट होऊ शकतो. ही उपकरणे कव्हर घालून झाकून ठेवा. विशेषत: स्मार्टफोन आणि टॅब्लेट.

बॅटरी संपण्यापूर्वी चार्ज करा : अनेक जण बॅटरी संपण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत फोन वापरतात. या सवयीमुळे तुमच्या डिव्हाइसचे नुकसान होऊ शकते. अशा परिस्थितीत बॅटरी पूर्णपणे संपेपर्यंत तिचा वापर करणे टाळा. बॅटरी २० टक्क्यांच्या खाली आणि ८० टक्क्यांच्या वर जाता कामा नये. एकापेक्षा जास्त डिव्हाइस असल्यास ते सर्व एकाच वेळी चार्ज करणे टाळा. योग्य वेळी चार्ज करा व प्रत्येक डिव्हाइस स्वतंत्रपणे चार्ज करा.

# प्रसिद्ध कादंबरीकार रणजित देसाई



**निमित्त**

प्रसिद्ध साहित्यिक रणजित देसाई यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म ८ एप्रिल १९२८ रोजी झाला. कादंबरीकार, कथालेखक, नाटककार अशी त्यांची ख्याती होती. देसाई मूळचे कोल्हापूरच्या कोवाडचे. शाळेत असतानाच त्यांनी लेखनाला सुरुवात केली. कोल्हापूरच्या 'महाद्वार'मधून त्यांनी कथालेखन करायला सुरुवात केली.

इंटर नापास असलेल्या देसाई यांनी १९४७मध्ये प्रसाद मासिकाने आयोजित केलेल्या कथा स्पर्धेत भैरव ही कथा लिहिली. त्यांच्या कथेला पारितोषिक मिळाले. या पारितोषिकामुळे त्यांच्या कथालेखनाला प्रोत्साहन मिळाले. रूपमहाल (१९५२), कणव (१९६०), जाण (१९६२), कातळ (१९६५), गंधाली (१९७१), कमोदिनी (१९७८), आलेख (१९७९), मधुमती (१९८२), मोरपंखी सावल्या (१९८४) असे अनेक लोकप्रिय कथासंग्रह त्यांनी लिहिले. ते खूप लोकप्रिय झाले.

सामाजिक आशयाच्या ग्रामीण परिवेशातील त्यांच्या कथांमधून त्यांच्या लेखनाची खास वैशिष्ट्ये जाणवतात. खेडुतांच्या जीवनाचे चांगुलपणा मांडणाऱ्या आकर्षक शैलीतील कथा त्यांनी लिहिल्या. बारी, माझा गाव, या प्रारंभीच्या कादंबऱ्यांनंतर १९६२मध्ये थोरल्या माधवराव पेशव्यांच्या जीवनावर त्यांनी स्वामी ही कादंबरी लिहिली. या कादंबरीने त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेले. त्यानंतरच्या 'श्रीमान योगी' या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर लिहिलेल्या कादंबरीने त्यांची कादंबरीकार म्हणून असलेली लोकप्रियता अधिकच वाढली. या कांदबरीमध्ये त्यांनी महाराजांचे जीवन आणि त्याचबरोबर हिंदवी स्वराज्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम याविषयी बारकाईने विश्लेषण केले आहे. महाराज एक व्यक्ती म्हणून त्यांची काय सुख दु:खे होती यावर त्यांनी मंथन केले आहे. या कांदबरीला इतिहास अभ्यासक नरहर कुरुंदकर यांनी प्रस्तावना लिहिलेली आहे. त्यात त्यांनी शिवाजी महाराजांनी पारंपरिक विचारसरणीमध्ये बदल केला. त्यामुळे त्यांना विजय संपादन करणे शक्य झाले यावर प्रकाशझोत टाकला आहे. देसाई यांनी 'स्वामी' ही माधवराव पेशव्यांच्या जीवनावर ऐतिहासिक कादंबरी लिहिली.

ऐतिहासिक वातावरणाचे वैभव आणि व्यक्तीरेखांना दिलेली भावोत्कट उंची यामुळे त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांनी लोकमानस जिंकले. स्वामीतील माधवराव आणि त्यांची पत्नी रमा तसेच श्रीमान योगीतील शिवाजी महाराज आणि रामदास स्वामी यांच्या नात्याला देसाई यांनी वेगळी परिमाणे दिली. लक्ष्यवेध (१९८०), पावनखिंड (१९८०), कर्णाच्या जीवनावरील राधेय (१९८६), राजा रविवर्मा (१९८६) अशा अनेक ऐतिहासिक, पौराणिक कादंबऱ्या लिहून देसाई यांनी या प्रकारच्या कादंबऱ्यांचे युग स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण केले.

गरुडझेप (१९७३), रामशास्त्री (१९८३), स्वरसम्राट तानसेन, हे बंध रेशमाचे, कांचनमृग, धन अपुरे, वारसा, स्वामी, आदी नाटकेही त्यांनी लिहिली. नागीण, रंगल्या रात्री अशा, सवाल माझा ऐका या चित्रपटांचे पटकथालेखन, स्नेहधारा, मी एक प्रेक्षक असे लेखसंग्रहही त्यांनी लिहिले. अशा या थोर साहित्यिकाचे ६ मार्च १९९२ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# गादीवर झोपण्यापेक्षा जमिनीवर झोपण्याचे फायदे

माणसागणिक प्रत्येकाच्या झोपायच्या सवयी या वेगळ्या असतात. काही जणांना गादीवर झोपायला आवडते तर काहीजण खाली जमिनीवर झोपणे पसंत करतात. बदलत्या काळानुसार आजकाल बहुतेक लोक गादीवर किंवा बेडवर झोपणेच पसंत करतात. गादीवर किंवा बेडवर झोपल्याने आपल्याला आरामदायक सुखाची अशी झोप लागते खरी, पण गादीवर झोपल्याने आपल्याला अनेक लहान-मोठ्या शारीरिक समस्या सतावू शकतात. याविरुद्ध जमिनीवर झोपण्याचे अनेक फायदे आहेत.



✻ हाडांची समस्या दूर होते : जमिनीवर झोपल्याने वाकडी-तिकडी झालेली हाडे नैसर्गिक स्थिती येतात आणि त्यांच्या संरचनेत सुधारणा होते. ही प्रक्रिया फार हळू गतीने होते, पण भविष्यात याचे अनेक फायदे बघायला मिळू शकतात. खाली जमिनीवर झोपल्याने हाडांच्या जॉइंट्समध्ये काही इजा झाली असेल तर तीसुद्धा याने बरी होऊ शकते.

✻ रक्ताभिसरण सुधारते : कठीण पृष्ठभागावर झोपल्याने शरीरावर एकसमान दाब पडतो. यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि स्नायूंचा कडकपणा कमी होतो.

✻ पाठीचा कणा सरळ राहील : मऊ गाद्या अनेकदा पाठीच्या कण्याच्या नैसर्गिक स्थितीत अडथळा आणतात, तर जमिनीवर झोपल्याने पाठीचा कणा सरळ राहतो. यामुळे पाठ आणि कंबरदुखीपासून आराम मिळतो.

✻ बॉडी पोश्चर चांगलं होतं : जमिनीवर झोपल्याने तुमच्या स्नायूंवर कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त दबाव पडत नाही. तसेच हाडेही नैसर्गिक स्थितीमध्ये असतात. बेडवर किंवा मुलायम गादीवर झोपल्याने तुम्हाला चांगलं तर वाटतं, पण त्याने बॉडी पोश्चर बिघडू शकतो. जमिनीवर एका चादरीवर झोपल्याने बॉडी पोश्चर चांगला राहतो.

✻ पाठदुखी दूर होते : जमिनीवर झोपल्याने पाठीचा कणा सरळ एका रेषेत राहत असल्याने शरीरात रक्तप्रवाह योग्यप्रकारे होतो. आणि हळूहळू पाठदुखीच्या त्रासातून सुटका मिळते. चुकीच्या पद्धतीने झोपल्यास किंवा जाड गादीवर झोपल्याने अनेकांना पाठदुखीचा त्रास होत असतो. याउलट खाली जमिनीवर झोपल्याने ही समस्या होणार नाही.

✻ हिप्स आणि खांद्यासाठी फायदेशीर : जमिनीवर झोपल्याने हिप्स आणि खांद्यांचं अलायमेंट चांगलं होतं आणि शरीरातील अनेकप्रकारचं दुखणं दूर होतं.

# मुरुडमधील शिवसृष्टीसाठी निधी कमी पडू देणार नाही -खासदार सुनील तटकरे

## आपण जनतेचे सेवक आहोत आपली बांधिलकी जनतेशी





**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरात शिवसुर्ष्टी उभी करण्यासाठी किमान २२ गुंठे जागा मुरुड नगरपरिषदेने मिळवून द्यावी जर नगरपरिषदेकडे जागा उपलब्ध नसेल तर शासकीय जागा द्यावी तिथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा व बाकीच्या जागेत शिवसुर्ष्टी उभारण्यास लागेल तेवढा खासदार निधी देण्यास तयार आहे.यासाठी उप विभागीय अधिकारी ,तहसीलदार मुरुड व मुख्याधिकारी यांनी एकत्र बसून याचा सुयोग्य आराखडा तयार करावा मी सर्वोतपरी मदत करणार असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष व खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले आहे.

मुरुड येथील दरबार हॉल येथे विविध खात्याची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी आपण जनतेचे सेवक आहोत आपली बांधिलकी जनतेशी असून होणारे विकास काम उत्कृष्ठ कसे होईल त्याचा दर्जा चांगला असावा यासाठी आपण प्रयत्नशील असले पाहिजे.असे खासदार सुनील तटकरे यांनी सर्व अधिकारी वर्गाला उद्देशून सांगितले

यावेळी मुरुड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते मनोज भगत,जिल्हा परिषद सदस्य नम्रता कासार,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अजित कासार,सोशल मीडिया सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन,महिला तालुका अध्यक्ष ऍड मृणाल खोत,माजी जिल्हा परिषद सदस्य सुबोध महाडिक,माजी सभापती बाबू नागावकर,माजी सभापती स्मिता खेडेकर,उप विभागीय अधिकारी दुर्गा देवरे ,तहसीलदार रोहन शिंदे , गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ ,पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर सर्व खात्याचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित लोकांनी महावितरण वीज पुरवठ्याबाबत विविध प्रश्न विचारले यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी महावितरणचे उप कार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी याना जिथे जिथे विजेचे प्रश्न आहेत तिथे भेटी देऊन लोकांच्या समस्यांचे निराकरण करा.जिथे निधीची आवश्यकता असेल तिथे मला पत्रव्यव्हार करा मी त्वरित निधी प्राप्त करून देणार आहे.यावेळी मासळी मार्केट येथे शनिवार रविवारी रस्ता मोकळा राहण्यासाठी मुख्याधिकारी यांनी त्वरित नियोजन करून लोकांना दिलासा देण्याचे काम करावे असे आदेश दिले.

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकारी वर्गाने ठेकेदाराशी हात मिळवणी करूनये उसरोली मार्गे सुपेगाव हा रस्ता लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावा यासाठी फणसाड अभयारण्य विभाग यांची काय अडचणी असतील तर ती विचारविनिमय करून सोडवण्यात येतील.नांदगाव बायपास रस्ता लवकरात लवकर पूर्ण करण्याचा मनोदय सुद्धा यावेळी त्यांनी व्यक्त केला.

जलजीवन योजनेची कामे उत्कृष्ठ झाली पाहिजेत यासाठी कोणाचीही तक्रार येता कामा नये.फणसाड पानलोट क्षेत्राने मे महिन्याच्या पाश्र्वभूमीवर प्रादेशिक क्षेत्राला पाणी किती द्यावयाचे व शेतीच्या सिंचनासाठी पाणी किती द्यवायचे यासाठी सुयोग्य आराखडा तयार करण्यात येऊन लोकांना पाणी टंचाई भासणार नाही याकडे विशेष लक्ष देण्याचे आदेश यावेळी तटकरे यांनी दिले.

# रायगड-रत्नागिरीला जोडणाऱ्या बागमांडला बाणकोट पुलाचे काम सुरू

**श्रीवर्धन : बातमीदार**

घाटमाथ्यावरून कोकणामध्ये येणाऱ्या पर्यटकांना रायगड व रत्नागिरी जिल्ह्यात जाण्या-येण्यासाठी बागमांडला - बाणकोट् पूल अत्यंत महत्त्वाचा आहे. नव्याने सुरू झालेले काम शासनाने लवकरात लवकर पूर्ण करून या ठिकाणच्या पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळावी. या उद्देशाने काम लवकरात लवकर पूर्ण करून घ्यावे. अशी मागणी स्थानिकांमधून व्यक्त केली जात आहे.



राज्यामध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार असतांना बहुचर्चित अशा कोकणातून समुद्रकिनारी मार्गे जाणाऱ्या सागरी महामार्गावरील बागमांडला ते बाणकोट या पुलाच्या कामाचे उद्घाटन सन २०१२ ते १३ च्या दरम्यान तत्कालीन मंत्री छगन भुजबळ यांचे हस्ते मोठा धुमधडाक्यात करण्यात आले होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री हरेश्वर, बागमंडला या ठिकाणी येणार म्हणून भर पावसामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ता ओला असताना देखील त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र नंतर झालेल्या जोरदार पावसामुळे सदरचा रस्ता पूर्णपणे उखडून गेला होता. सदर पुलाच्या बांधकामाचा ठेका सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने घेतलेला होता. मात्र सदर कंपनीने केवळ पुलाचे पिलरच उभे करून हे काम अर्धवट सोडल्याची बाब समोर आली आहे. सुरुवातीला या पुलाच्या बांधकामाची रक्कम अंदाजे १८२ कोटी रुपये ठरविण्यात आली होती. परंतु त्यानंतर या खाडी मधून मोठी जहाजे जातील या कारणाने पुलाची उंची वाढवून जवळजवळ साडेचारशे कोटी रुपयांची तरतूद या पुलाच्या बांधकामासाठी करण्यात आली होती.वास्तविक पाहता मोठी जहाजे जातील, एवढी बाणकोट खाडीची लांबी, रुंदी व खोली सुध्दा नाही. त्यासाठी खाडीमार्गातून जाणारे पुलाचे पिल्लर खुप उंचीचे बांधण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नवीन जाहीर निविदा काढून पुलाच्या नवीन कामाची निविदा काढली आहे व संबंधित ठेकेदाराने पुलाचे काम सुरू केले आहे. २०१२ ते १३ च्या दरम्यान सुरू झालेले हे पुलाचे काम २०१५ पर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा होती. जर २०१५ साली या पुलाचे काम पूर्ण झाले असते तर, रायगड व रत्नागिरी जिल्हे एकमेकांना जोडले जाऊन या ठिकाणी पर्यटन व्यवसाय खूप मोठ्या प्रमाणावरती बहरला असता.

परंतु राजकीय अनास्थेमुळे या पुलाचे बांधकाम अनेक वर्षांपासून रखडूनच राहिले. आता नव्याने होत असलेले पुलाचे बांधकाम देखील चौपदरी करणे आवश्यक आहे. कारण या मार्गावरून खूप मोठ्या प्रमाणावर वाहतूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# महामार्गाच्या रुंदीकरणासाठी वृक्षतोड ; श्री सदस्यांच्या मेहनतीवर पाणी

**कर्जत : प्रतिनिधी**

श्री सदस्यांकडून कर्जत-मुरबाड हायवेच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली होती. २०१८ - १९ दरम्यान लावलेल्या शेकडो झाडांसाठी प्रतिष्ठानच्या सदस्यांना क्रमांक देऊन त्यांची जोपासना केली होती ही रस्त्याच्या दुतर्फा लावलेली झाडे नष्ट झाली आहेत. त्यामुळे नव्याने झाडे लावण्याची मागणी स्थानिक स्थानिक करीत आहेत.

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या वतीने रायगड, ठाणे जिल्ह्यात सत्याच्या दुतर्फी तसेच डोंगर भागात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्यात आली आहे. काही ठिकाणी ती झाडे मोठी झाली असून, त्या त्या भागात सावली निर्माण झाली आहे. याच धर्तीवर श्री सदस्यांकडून कर्जत-मुरबाड हायवेच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली होती. २०१८ - १९ दरम्यान लावलेल्या शेकडो झाडांसाठी प्रतिष्ठानच्या सदस्यांना क्रमांक देऊन त्यांची जोपासना करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. मात्र येथील राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाच्या कामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळने या झाडांची कत्तल केली. या महामार्गाच्या शहापूर, मुरबाड, कर्जत आणि खालापूर परिसरात लावलेली झाडे नष्ट करण्यात आली आहेत.

महामार्गाच्या दोन्ही बाजूंना नव्याने झाडे लावण्याची मागणी स्थानिक रहिवाशी यांच्या कडून होत आहे. विशेष म्हणजे महामार्गाच्या दुभाजकांमध्ये झाडे लावण्यात येणार होती, परंतु प्रत्यक्षात त्या झाडांचा कोणताही ठावठिकाणा अद्याप दिसून येत नाही. सध्या पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. त्यामुळे निसर्गावर विपरीत परिणाम होत आहे. वाढते औद्योगिकरण , उष्णतेत होणारी वाढ ,ओला दुष्काळ, वादळे, भूकंप यासारख्या नैसर्गिक आपत्तीची तीव्रता वाढताना दिसत आहे.

**'विकासकामांसाठी झाडे तोडली असतील तर पुढील काळात संबंधित विभागाकडून झाडांची लागवड करण्याचा प्रयत्न वन विभाग करणार आहे. '**

**-प्रदीप चव्हाण,**
**वन परिक्षेत्र अधिकारी, कर्जत.**

याशिवाय झाडांची कमी झालेली संख्या पशुपक्ष्यांच्या अस्तित्वालाही धोका निर्माण करतो आहे. रस्त्याचे रुंदीकरण आणि विकास महत्वाचे असले तरी झाडांची जोपासना होणे अत्यंत गरजेचे आहे.



# पाणी व स्वच्छतेसाठी कार्य करणाऱ्या महिलांचा होणार सन्मान

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता मिशन कक्षातर्फे पाणी, स्वच्छता, आरोग्य संबंधित उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिलांना प्रेरणा देण्यासाठी ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्ताने सन्मान करण्यात येणार आहे तसेच या दिवशी ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी दिली.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्यावतीने जिल्ह्यात जागतिक महिला दिनानिमित्त ग्रामपंचायत स्तरावर महिलांची विशेष धाव (वॉश रन) आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये महिला, किशोरवयीन मुली, विद्यार्थीनी, स्वच्छता कर्मचारी, पाणी व स्वच्छता समितीचे सदस्य व ग्रामपंचायत सदस्य सहभागी होणार असून, पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित संदेशाद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच ८ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष महिला सभेचे आयोजन केले आहे. सदर दिवशी ग्रामपंचायतीमध्ये पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित कार्यक्रमाच्या अंमलबजावणी दरम्यान सद्यस्थितीत येणाऱ्या अडी अडचणी बाबत चर्चा विनिमय करण्यात येणार आहे.

पाणी व स्वच्छतेचे व्यवस्थापन करणारे स्वयंसेवी गट, नेते, किशोरवयीन चॅम्पियन, पाणी गुणवत्ता बाबत देखभाल दुरुस्त करणाऱ्या महिला आणि पाणी, स्वच्छता व आरोग्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सर्व व्यक्तींचा विशेष सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी दिली आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना फाशी द्या; शिवसेनेकडून मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याला भर चौकात न्यायालयाने फाशी द्यावी म्हणून शिंदेंच्या शिवसेनेने कर्जत येथे आंदोलन करुन पोलीस ठाण्यात लेखी निवेदन देण्यात आले आंदोलनकर्त्यांनी वाल्मिक कराडला फाशी द्या, फासी द्या अशी घोषणा देखील दिल्या.

बीडच्या मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाने आता नवीन वळण घेतले असून याचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर सर्वस्तरांतून संताप व्यक्त केला जात आहे. एकीकडे धनंजय मुंडे यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. तर दुसरीकडे महायुतीतल्या शिंदेंच्या शिवसेनेने वाल्मिक कराडला फाशी द्या म्हणून कर्जत शहराच्या टिळक चौकात वाल्मीक कराड यांच्या विरोधात घोषणा देत निदर्शने केली.

यावेळी पोलीस ठाण्याचे अधिकारी सुरेंद्र गरड यांना निवेदन देण्यात आले आहे. याप्रसंगी भाई गायकर, संघटक संभाजी जगताप, शिवराम बदे, तालुका प्रमुख सुदाम पवाळी, उप तालुका प्रमुख रामचंद्र मिणमिने, कर्जत शहर प्रमुख अभिषेक सुर्वे आदी सह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.





अर्जदारातर्फे वकील
अॅड. उज्वला तेटगुरे

**मे. दिवाणी न्यायाधिश क स्तर पनवेल यांचे कोर्टात**

चौकशी अर्ज क. ७७/२०२५
पु.ता. २०/०३/२०२५
नि.८ ड

१. श्रीमती सरिता अमितकुमार दास
२. कु. आयुष्मान अमितकुमार दास
यांचे तर्फे अज्ञान पालन कर्ती आई श्रीमती सरिता अमितकुमार दास दोघे राहणार : रूम नं. ३०५, ए विंग, रामचंद्र निकेतन, नवघर क्रॉस रोड, साई मंदिर नगर जवळ, ठाणे, ४०११०५ .......... अर्जदार

जाहिर नोटीस

सर्व तमाम लोकांस कळविण्यांत येते की, ज्याअर्थी के. अमितकुमार दूलालचंद्र दास यांचे दिनांक २३/०९/२०२० रोजी रोजी ऑर्बिट हॉस्पीटल, मिरा भायंदर, ठाणे येथे त्यांचे निधन झाले आहे.

कै. अमितकुमार दूलालचंद्र दास यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पूढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे खारघर, ता. पनवेल जि. रायगड येथील मिळकत बीयुडीपी प्लॉट नं. बी-४८, सब प्लॉट नं. १५, प्रतिक सहकारी गृहनिर्माण संस्था (म.) सेक्टर १२, क्षेत्रफळ ३२ चौ. मी. या मिळकतीवर बांधणेत आलेले घर**

मयत कै. अमितकुमार दूलालचंद्र दास यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तिगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन वर नमुद मे. न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यांत येते की, वर नमुद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै. अमितकुमार दूलालचंद्र दास यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक ०५/०३/२०२५ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**लिपिक**
**दिवाणी न्यायालय (क स्तर)**
**पनवेल, जिल्हा रायगड**

शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय (क स्तर)**
**पनवेल, जिल्हा रायगड**



## दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

**४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल**

**ताबा सूचना**

**(स्थावर मालमत्तेकरिता)**
**(सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट नियमन, २००२ नुसार)**

ज्याअर्थी,
**मी, श्री. अजय लक्ष्मण कुलकर्णी**, मुख्य कार्यकारी अधिकारी, दि पनवेल को-ऑप अर्बन बँक लि., बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अमंलबजावणी) नियमन २००२ च्या नियम ९ आणि कलम १३ (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्यासमोर नमूद केलेल्या दिनांकास मागणी सूचना जारी करून संबंधित कर्जदारा/रांकडे प्रत्येक खात्यासमोर उल्लेखिलेली रक्कम सूचनेच्या दिनांकापासून/ सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत परतावा करण्याची मागणी केली होती.
**कर्जदार सदर रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचना देण्यात येते की,याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेच्या निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमनाच्या** नियम ९ **सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्याच्या समोर उल्लेखिलेल्या दिनांकास ताबा घेतला आहे.**
विशेषतः कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्ते/त्तांबाबत कोणताही व्यवहार हा दि पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.च्या रक्कम आणि त्यावरील व्याजाच्या प्रभारास अधीन असेल.

| अ. क्र. | कर्जदार/गहाणवटदार/ जामीनदाराचे नाव (मालमत्तेचे मालक) | गहाणवट मालमत्तेचे वर्णन | मागणी सूचनेचा दिनांक | ताबा सूचना चिटकवण्याचा दिनांक | मागणी सूचनेच्या दिनांकास थकबाकी रक्कम (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सौ. स्मिता भगवान कल्याणकर (कर्जदार/ गहाणवटदार), श्री. भगवान नारायण कल्याणकर (जामीनदार) आणि श्री. संतोष अंकुशराव सुतार (जामीनदार) | सौ. स्मिता भगवान कल्याणकर यांच्या नावे असलेले दुकान क्र. १२, सुधीर अपार्टमेंट, मालमत्ता क्र. ११३७/१/७, ११३८/१/९, मिरची गल्ली, पनवेल, तालुका पनवेल, जि. रायगड ४१०२०६, क्षेत्रफळ १६५ चौ.फू. | २५.१०.२०२४ | ०१.०३.२०२५ (सांकेतिक) | दि. २५.१०.२०२४ रोजीनुसार रु. ६,४८,८३८.६० (रुपये सहा लाख अठ्ठेचाळीस हजार आठशे अडतीस आणि साठ पैसे मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.१०.२०२४ पासूनचे व्याज. |
| २ | श्री. मेघनाथ हिरामण म्हात्रे (कर्जदार/गहाणवटदार), श्री. गणेश नागेश म्हात्रे (जामीनदार) आणि श्री. सचिन कृष्णा चौधरी (जामीनदार) | श्री. मेघनाथ हिरामण म्हात्रे यांच्या नावे असलेले घर क्र. १०९, विठ्ठलवाडी, दत्त मंदिरजवळ, मुक्काम पोस्ट नावडे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०८. क्षेत्रफळ १२९० चौ.फू. | १२.११.२०२४ | ०३.०३.२०२५ (सांकेतिक) | दि. ३१.१०.२०२४ रोजीनुसार रु. २४,१७,११५/- (रुपये चोवीस लाख सतरा हजार एकशे पंधरा मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.११.२०२४ पासूनचे व्याज. |
| ३ | श्री. बळीराम गणपत डांगरकर (कर्जदार/गहाणवटदार), श्री. सुरेश लक्ष्मण डांगरकर (जामीनदार) आणि श्री. महादेव नारायण डांगरकर (जामीनदार) | श्री. बळीराम गणपत डांगरकर यांच्या नावे असलेले घर क्र. १२१, मोजमाप १००० चौ.फू. मौजे उसरली बुद्रुक, ग्रामपंचायत उमरोली, तालुका पनवेल, जि. रायगड. | २५.१०.२०२४ | ०३.०३.२०२५ (सांकेतिक) | दि. २५.१०.२०२४ रोजीनुसार रु. ४,३५,०१३/- (रुपये चार लाख पस्तीस हजार तेरा मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.१०.२०२४ पासूनचे व्याज. |
| ४ | श्री. अशोक वामन देशेकर (कर्जदार), श्री. गणेश शंकर पाटील (जामीनदार) आणि श्रीमती निलम अशोक देशेकर (जामीनदार) | श्री. अशोक वामन देशेकर यांच्या नावे असलेले घर क्र. ७३, गाव चिघरण, तालुका पनवेल, जि. रायगड ४१०२०६. | २५.१०.२०२४ | ०३.०३.२०२५ (सांकेतिक) | दि. २५.१०.२०२४ रोजीनुसार रु. २३,४९,१२४/- (रुपये तेवीस लाख एकोणपन्नास हजार एकशे चोवीस मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.१०.२०२४ पासूनचे व्याज. |
| ५ | श्री. तुलसीराम भागाजी तातरे (कर्जदार/गहाणवटदार), सौ. शिला तुलसीराम तातरे (कर्जदार/गहाणवटदार), श्री. गणेश महादू जाधव (जामीनदार) आणि श्री. किरण अनंता बडेकर (जामीनदार) | श्री. तुलसीराम भागाजी तातरे आणि सौ. शिला तुलसीराम तातरे यांच्या नावे असलेले घर क्र. १७, गाव खाणव, पोस्टच मोर्बे, तालुका पनवेल, जि. रायगड - ४१०२०६. क्षेत्रफळ ३९०.१४ चौ.फू. | १२.११.२०२४ | ०३.०३.२०२५ (सांकेतिक) | दि. ३१.१०.२०२४ रोजीनुसार रु. ५,६४,५३६/- (रुपये पाच लाख चौसष्ट हजार पाचशे छत्तीस मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.११.२०२४ पासूनचे व्याज. |

तारण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार / जामीनदार / गहाणवटदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**

**दिनांकः ०६.०३.२०२५**
**ठिकाणः पनवेल**

# हवामान बदलाने आंबा उत्पादन घटले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

एपीएमसी बाजारात यावर्षी हापूस हंगाम सुरळीत राहील अशी अपेक्षा होती, परंतु ऐन फळधारणेच्या कालावधीत हापूसच्या उत्पादनावर संक्रात ओढावली. पाऊस, हवामान बदल, तसेच कडाक्याच्या थंडीने आंब्यांवर परिणाम झाला असून उत्पादन घटले आहे. त्यामुळे यंदा ३५ ते ४० टक्के उत्पादन असेल, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे.

समाधानकारक पाऊस पडत आहे, त्यामुळे हापूस उत्पादन चांगले असेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती, मात्र दुसरीकडे वेळोवेळी हवामानात होणाऱ्या बदलाचा फटका आंब्याला बसला. त्यामुळे अपेक्षित जादा उत्पादनात घट होताना दिसत आहे.



मागील वर्षी बाजारात फेब्रुवारी महिन्यात लवकर आवक सुरू झाली होती. तर मार्च मध्ये हंगाम सुरू झाला होता, मार्च मध्ये ४० ते ५० हजार पेट्या दाखल होत होत्या. यावेळी मात्र मोठ्या संख्येने दाखल होणाऱ्या आंब्यात घट होऊन कमी हापूस दाखल होत आहे. फेब्रुवारीमध्ये एक दिवस आड कोकणातील हापूसच्या पेट्या दखल होत होत्या तर सध्या बाजारात आता तीन ते साडेतीन हजार पेट्या दाखल होत आहेत. त्यामुळे यावर्षी हापूसचा हंगाम अवघा ३५ ते ४० टक्के आहे. तसेच मे अखेर पर्यंत सुरु असणारा हंगाम लवकर संपुष्टात येणार आहे.

## हंगाम यंदा ४० दिवसांचा

एरव्ही ३ ते ४ महिने हंगाम सुरू असतो, यंदा मात्र २० मार्च ते एप्रिल अखेर तसेच काही तुरळक आवक १०मे पर्यंत राहील असे मत घाऊक फळ व्यापारी संजय पिंपळे यांनी व्यक्त केले आहे. सध्या बाजारात रत्नागिरी, देवगडचा, रायगडचा हापूस दाखल होत असून ४-६ डझनाच्या पेटीला तीन हजार ते सहा हजार रुपये दराने विक्री होत आहे.

**यंदा उत्पादन केवळ ३५ ते ४० टक्के आहे. उष्णता वाढल्याने दर्जावर परिणाम होत आहे. अशा हवामान बदलाच्या परिस्थितीत आंबा उत्पादकांना उत्पादन काढणे आव्हानात्मक ठरत आहे. मागील वर्षी बाजारात फेब्रुवारी महिन्यात लवकर आवक सुरू झाली होती. यावेळी मात्र आंब्यात घट होऊन कमी हापूस दाखल होत आहे.**

**-चंद्रकांत मोकाल, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक**

# होळीसाठी कोकणात उरणमधून जादा बस सोडण्याची मागणी

**उरण : बातमीदार**

उरण शहरातील व विविध गावातील अनेक चाकरमानी होळीला गावी कोकणात जात असतात. कोकणात होळी सणासाठी प्रवास करताना कोकणी माणसाला कोणत्याही प्रकारची अडचणी येऊ नयेत, या दृष्टिकोनातून दरवर्षी कोकणवासीय उत्कर्ष संस्थेतर्फे उरण बस आगारातून कोकणात जाण्यासाठी जादा बस सोडण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आलेली आहे.

या जादा बस सोडण्यासाठी संस्थेचे सचिव रवींद्र चव्हाण, कार्याध्यक्ष नंदकुमार साळवी यांनी उरण बस आगार तसेच मुंबई कार्यालय, मुंबई उप विभाग कार्यालय येथे पत्रव्यवहार केला आहे. ९ ते १२ मार्च या दरम्यान बसेस उरण आगारातून सोडण्यात याव्यात.



उरण ते रत्नागिरी, उरण ते सिंधुदुर्ग, उरण ते खेड, उरण ते दापोली, उरण ते देवरुख, उरण ते कणकवली, उरण ते गणपतीपुळे या मार्गावर जादा बस सोडण्याची मागणी कोकणवासीय उत्कर्ष संस्था उरणतर्फे उरण बस आगार व्यवस्थापक गीता कोंडार यांना करण्यात आली आहे.

मुंबई कार्यालय, उपविभाग कार्यालय यांचा पत्रव्यवहाराला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे तसेच उरण आगाराचे व्यवस्थापक गीता कोंडार यांनी या पत्रव्यवहाराला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून प्राचार्या निशा नायर यांचे अभिनंदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या निशा नायर यांना ब्रेनफीड वूमन इन एडुकेशन कॉनक्लेव्ह २०२५च्या निमित्ताने ब्रेनफीड एक्सेम्पलरी वुमन इन एज्युकेशन अवॉर्ड २०२५ या पुरस्काराने २ मार्च २०२५ या दिवशी सन्मानित करण्यात आहे.

याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्राचार्या निशा नायर यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीकरता शुभेच्छा दिल्या.

हा पुरस्कार प्रामुख्याने शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट समर्पण, नवोपक्रम आणि योगदानासाठी दिला जातो. प्राचार्या निशा नायर या सतत विद्यार्थ्यांच्या मनाला सक्षम कसे करता कसे करता येईल, शैक्षणिक उत्कृष्टतेला कशी चालना देता येईल याच्या प्रयलात असतात. विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणे, नवोपक्रम राबविणे यामुळेच त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांचे या पुरस्काराबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# मानखुर्द-वाशी मार्गावरील काँक्रीटीकरण पूर्णत्वास

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ठाणे खाडीवर मुंबई-पुणे, पुणे-मुंबई दोन्ही दिशांना दोन २ नवीन बहुचर्चित उड्डाणपूल तयार करण्यात आले असून आता वाशीहून मुंबईकडे जाणाऱ्या तिसऱ्या उड्डाणपुलाचे कामही पूर्णत्वास आले आहे. तर मानखुर्दच्या दिशेने नवी मुंबईकडे येणाऱ्या रस्त्याचे काम पूर्ण झाले असून पुढील काही दिवसांतच या मार्गावर होणाऱ्या वाहतूककोंडीतून वाहनचालकांची सुटका होणार असल्याची माहिती मानखुर्द व नवी मुंबई वाहतूक विभागाने दिली आहे.



अटलसेतू झाल्यानंतर वाशी उड्डाणपुलावरील ताण काहीसा कमी झाला होता तसेच उरण, पनवेलची वाहतूक अटल सेतूवरून जात होती, परंतु शासनाच्या टोलमाफीनंतर अटल सेतूवरुन मुंबईला दररोज जाणाऱ्या १० ते १२ हजार गाड्यांची वाहतूक पुन्हा वाशी खाडीपूल मार्गाने होत आहे. मुंबईहून वाशीकडे येणाऱ्या पुलावरुन वाहतूक सुरू झाली असली तरी मानखुर्द दिशेकडील काम सुरू असल्याने मुंबईहून वाशीकडे येताना ५ लेनची वाहतूक २ लेनमध्ये वर्ग होत होती. त्यामुळे उड्डाणपुलाच्या तोंडाशी मानखुर्दपर्यंत रांगा लागत होत्या. परंतु आता हे काम पूर्णत्वास आले असल्याची माहिती एल अँड टी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिली.

दुसरीकडे वाशीवरुन मुंबईला जाताना ११ लेनची वाहतूक दुसऱ्या उड्डाणपुलाच्या तोंडाशी टोलनाक्यावर फक्त दोन लेनमध्ये वर्ग होत असल्याने सकाळी व संध्याकाळी वाहनचालकांना वाहतूककोंडीचा सामना करावा लागत होता, परंतु त्या उड्डाणपुलाचेही काम पूर्ण झाले आहे. तर मानखुर्दकडे जाताना जकात नाक्याजवळील काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्यामुळे एल अँड टी कंपनीकडून उभारण्यात आलेल्या तिसऱ्या पुलाचे काम पूर्ण झाल्याने पुढील काही दिवसांतच वाशी उड्डाणपुलावरील सततच्या वाहतूककोंडीतून वाहनचालकांची सुटका होणार आहे.

**तिसऱ्या खाडीपुलावरुन वाहतूक सुरू करण्याच्या संभाव्य तारखाही प्राप्त झाल्या आहेत. मानखुर्दहून वाशीकडे जाणारे काम पूर्ण झाले असून आता नव्या पुलावरुन सलग वाहतूक सुरु केली जाणार आहे.**

**-मंगेश शिंदे,**
**मुख्य वाहतूक निरीक्षक, मानखुर्द**

# अनुभव प्रमाणपत्र न देण्याचे पालिकेचे अधिकाऱ्यांना आदेश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योनेजंतर्गत विविध पदांवर प्रशिक्षणार्थ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. ही नेमणून तात्पुरत्या स्वरूपात होती.

विभाग/कार्यालयात कार्यरत प्रशिक्षणार्थी यांचा प्रशिक्षण कालावधी संपुष्टात आल्यानंतर, त्यांना त्वरीत कार्यमुक्त करावे तसेच त्यांना विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकारात अनुभव प्रमाणपत्र देऊ नये , या प्रशिक्षणार्थींना सामान्य प्रशासन अनुभव प्रमाणपत्र देईल असे आदेश नवी मुंबई महापालिकेच्या प्रशासन विभागाने काढले आहेत.

महाराष्ट्र शासन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांनी याबाबत शासन निर्णय काढून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना याबाबत अवगत केले आहे. त्यानुसार नवी मुंबई पालिकेने हा निर्णय घेतला आहे. मुख्य म्हणजे अनेक विभागाधिकाऱ्यांनी याबाबत आपल्या विभागातील अनेक प्रशिक्षणकर्त्यांना अनुभव प्रमाणपत्र दिली आहेत.

ही बाब गंभीर असून, सदरील अनुभव प्रमाणपत्र आपल्या विभागामार्फत निर्गमित न करता, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत कार्यरत प्रशिक्षणार्थी यांचा प्रशिक्षण कालावधी संपुष्टात आल्यानंतर सामान्य प्रशासन विभागामार्फत अनुभव प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल असे आदेश सामान्य प्रशासनाने काढले आहेत.

# आक्षीकर विद्या संकुलात आजी आजोबा दिवस



**उरण : बातमीदार**

समाजातील नातेवाईक किंवा कुटुंब परंपरेत आजी आणि आजोबा यांचे स्थान महत्वाचे आहे. आजी आजोबा यांनी केलेले संस्कार नातवावर कायमस्वरूपी टिकत असतात. आजी आजोबा यांचे महत्त्व येणाऱ्या भावी पिढीला कळावे, त्यांचे महत्त्व सर्वांना कळावे या दृष्टीकोणातून दरवर्षी कै गो.ना.आक्षीकर विद्या संकुलात आजी आजोबा दिवस (पेरेंट्स डे) साजरा केला जातो.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी कै गो. ना.आक्षीकर विद्या संकुलातील जी.ई. आए. एस इंग्लिश मीडियम स्कूल उरण प्री प्रायमरी आणि प्रायमरी यांच्यातर्फे शाळेमध्ये पेरेंट्स डे साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी माजी शिक्षक पि. ए पाटील, मनीषा पाटील, माजी शिक्षिका सुनंदा कुमार, एन.आय.हायस्कूल मुख्याध्यापक लक्ष्मण भोये, शालेय समिती सदस्य जयश्री भारंबे तसेच पालक शिक्षक संघ सदस्य यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम मोठया उत्साहात साजरा झाला.

शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांच्या उपस्थित कार्यक्रम सादर झाला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मोहिनी पाटील, मनाली सावंत, क्षमा थळी,माधवी घरत यांनी केले.या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचे आजी आजोबा मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

# फेब्रुवारीमध्ये जेएनपीएत कंटेनर हाताळणी वाढली

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

देशातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने फेब्रुवारी २०२५ मध्ये ६१६,१६४ टीईयू कंटेनर हाताळले. फेब्रुवारी २०२४ च्या तुलनेत ९.१४ टक्के अधिक आहेत. जनेप प्राधिकरणाने ६,६२९,२४२ टीईयू कंटेनर वाहतूक हाताळली. जी मागील आर्थिक वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत १३.६० अधिक आहे.

फेब्रुवारी २०२५ मध्ये, जनेप प्राधिकरणाने ६१६,१६४ टीईयू कंटेनर आणि ७.५६ दशलक्ष टन एकूण माल हाताळला, जो फेब्रुवारी २०२४ मधील वाहतुकीपेक्षा अनुक्रमे ९.१४ आणि २.०९ टक्के जास्त आहे. फेब्रुवारी २०२४ मधील ५२६ कंटेनर रॅक आणि ८४,३५० टीईयू कंटेनरच्या तुलनेत फेब्रुवारी २०२५ मध्ये जनेप प्राधिकरणाने ५३४ कंटेनर रॅक आणि ८६,१४२ टीईयू कंटेनर हाताळले.

आर्थिक वर्ष २०२४-२०२५ ची ठळक वैशिष्ट्ये यात एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत जनेप प्राधिकरणाने ६,६२९,२४२ टीईयू कंटेनर आणि एकूण ८३.८५ दशलक्ष टन मालवाहतूक केली, जी मागील आर्थिक वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत अनुक्रमे १३.६० टक्के आणि ७.४३ टक्के अधिक आहे. एप्रिल-२०२४ ते फेब्रुवारी-२०२५ या कालावधीत जनेप प्राधिकरणाने ६,१६४ कंटेनर रॅक आणि ९७८,१३० टीईयू हाताळले. तर मागील आर्थिक वर्षात याच कालावधीत ५,८६४ कंटेनर रॅक आणि ९३५,५०३ टीईयू कंटेनर हाताळले होते.

परिचालन कार्यक्षमता आणि व्यापार-केंद्रित सेवांवर लक्ष केंद्रित करून, जनेप प्राधिकरण भारताच्या सागरी व्यापाराला चालना देत आहे.

# शिवनगर शाळेतर्फे ‘माझी वसुंधरा’अंतर्गत विविध उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासांबे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील शिवनगर शाळेने माझी वसुंधरा अभियानामध्ये उत्स्फूर्तपणे सक्रिय सहभाग घेऊन विविध प्रकारच्या जनजागृती व उपक्रम राबविले. प्लॅस्टिक पिशवी हटवू या, कापडी पिशवी वापरु या...अशी घोषणा देत शिवनगरच्या विद्यार्थ्यांनी प्लॅस्टिक विरोधी रॅली काढून जनजागृती करण्यात आली.

तसेच विविध ठिकाणी पृथ्वीच्या पंचतत्वाचे संरक्षण व संवर्धन याबाबत कार्यक्रम करण्यात आला. शिवनगर शाळेत, रविवार बाजारपेठेत, तसेच संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान च्या पुरस्कार वितरण सोहळ्यामध्येदेखील शिवनगरच्या विद्यार्थ्यांने कार्यक्रम सादर करुन रसायनी पंचक्रोशीतील विविध शाळांचे विद्यार्थी पालक व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत माझी वसुंधरा अभियानातून शाश्वत विकासात्मक प्रयत्न करण्याबाबत जनजागृती केली. तसेच या विद्यार्थ्यांनी शिवनगर येथे प्रदुषण मुक्त, फटाकेमुक्त सण साजरे केले जावेत म्हणून रॅली काढुन जनजागृती सुद्धा केली.



या रॅलीमधे शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, माता पालक, बचतगट सदस्या सहभागी झाल्या होत्या.रा.जि.प.शाळा.शिवनगर च्या विद्यार्थ्यांनी माझी वसुंधरा ५.० अंतर्गत राबवलेला आणखी एक उपक्रम म्हणजे बीजसंकलन. विद्यार्थ्यांनी स्थानिक वनस्पती, खाल्लेली फळे यांच्या बीयांचे बीज गोळे तयार करण्यासाठी सुबाभूळ, काजु, चिकु, जाम, पपई, सीताफळ, रांजणं, दुधी कारली, मिरची, टोमॅटो, तुळस, सब्जा इत्यादी बीयांचे संकलन केले. त्यानंतर सदर संकलित केलेल्या स्थानिक वनस्पती, खाल्लेली फळे यांच्या बीयांचे माती, शेणखत याचा वापर करून बीजगोळे तयार करण्यात आले. तसेच शाळेमधे गृप ग्रामपंचायत वासांबे अंतर्गत माझी वसुंधरा अभियान या विषयावर चित्रकला स्पर्धादेखील घेण्यात आल्या.

माझी वसुंधरा ५.० अंतर्गत शिवनगर येथील बचतगट महिलांनी प्लॅस्टिक बंदीची शपथ घेऊन रॅली काढुन जनजागृती करण्यात आली. तसेच माझी वसुंधरा ५.० अंतर्गत आपला ऐतिहासिक वारसा जपत दिवाळी सणाच्या आनंदात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली किल्ले व ऐतिहासिक संस्कृतीचे बालगोपालांना विद्यार्थी दशेतच महत्त्व समजावे व अभ्यास व्हावा,तसेच पूर्वजांच्या पराक्रमाच्या स्मृती जपाव्यात या हेतूने रा.जि.प.शाळा.शिवनगर तर्फे किल्ले स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

रा.जि.प.शाळा.शिवनगरच्या मुख्याध्यापिका रजनी गायकवाड यांनी सांगितले की, विकास हा ग्रामपंचायत स्तरापासून केंद्रशासन स्तरापर्यंत होतच आहे परंतु हा विकास होत असताना निसर्गाचा होणारा र्हास लक्षात घेऊन निसर्गाचे संवर्धन करणे गरजेचे आहे. म्हणूनच शासनाच्या या माझी वसुंधरा अभियानाला साथ देणे गरजेचे आहे. म्हणूनच आमचे विद्यार्थी या अभियानात ऊतरले आहेत आणि जेथे शक्य आहे तिथे तिथे जनजागृती करत आहेत.

# नवी मुंबईत आणखी एक ईटीसी केंद्राची उभारणी होणार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील पालिकेच्या वाशी येथील अपंग प्रशिक्षण अर्थात ईटीसी केंद्राचा देशपातळीवर उत्कृष्ट कामगिरीबाबत गौरव केला आहे. वाशी येथील केंद्रातून आतापर्यंत हजारो अपंग विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे व या विशेष मुलांच्या आयुष्यात आनंद मिळवून देण्याचे काम पालिकेच्या ईटीसी केंद्रामार्फत करण्यात येते. पालिकेने नुकत्याच मांडलेल्या अर्थसंकल्पात शहरात आणखी एक ईटीसी केंद्र निर्माण करण्याचा संकल्प केला आहे.

नवी मुंबई शहरात विद्यार्थ्यांसाठी ५० पेक्षा अधिक विविध माध्यमाच्या शाळा असून २००७ मध्ये रबाळे येथे तत्कालीन ईटीसी संचालक वर्षा भगत यांच्या प्रयत्नातून ईटीसी केंद्र सुरू केले होते.त्यानंतर हे केंद्र नेरूळ येथे सुरू करण्यात आले होते.



शहरातील अपंग विद्यार्थ्यांना शिक्षण मिळण्यासाठी पालिकेचा हा उपक्रम सातत्याने वाढत गेला. त्यानंतर पालिकेने वाशी रेल्वेस्टेशनवळ अपंग विद्र्यार्थ्यांना सोयीसुविधा व शिक्षण देण्यासाठी भव्य केंद्र निर्माण केले या केंद्रातील विद्यार्थ्यांमार्फत विविध वस्तू तयार केल्या जातात तसेच त्यांना आवश्यक असलेल ज्ञान देण्याचे काम पालिकेच्या वतीने केले जाते. पालिकेच्या याच कामाचा देशपातळीवर अनेकवेळा गौरव करण्यात आला आहे. वाशी येथील याच ईटीसी केंद्राच्या विस्तारीकरणातून एक नवे केंद्र ऐरोली येथे उभारण्यात येणार आहे.

**मागील अनेक वर्षापासून विशेष मुलांसाठी शिक्षणाची ईटीसी केंद्राद्वारे दिली जाते. आता पालिका ऐरोली विभागात आणखी एक केंद्र निर्माण करत असल्याने या भागातील विशेष मुलांना चांगली सुविधा प्राप्त होईल.**

**-वर्षा भगत, माजी ईटीसी संचालक, वाशी केंद्र**

### ईटीसी केंद्रात संगणक

सर्वसामान्य विद्यार्थ्याप्रमाणेच अपंग विद्यार्थ्यांनाही संगणकाचे ज्ञान मिळावे यासाठी पालिका सध्या सुरू असलेल्या ईटीसी केंद्रात अद्ययावत संगणक लॅब उभारणार आहे. जेणेकरुन या विशेष विद्यार्थ्यांना आयटी अभ्यासक्रम पूर्ण करता येईल त्यादृष्टीने पालिकेने अर्थसंकल्पात तरतूद केली आहे.

# राज्य शासनाने मासळीचा दुष्काळ जाहीर करावा

## मनोहर मकु यांची मागणी





**मुरुड : प्रतिनिधी**

सध्या मच्छिमारांना मुबलक मासळी मिळत नाही. त्यामुळे मच्छिमारांना मासळी मिळवण्यासाठी खूप दूरवर जावे लागते. त्यामुळे डिझेलचा अतिरिक्त खप वाढला आहे मच्छीमार कर्ज घेऊन मासळी व्यवसाय करीत आहेत. परंतु मोठ्या प्रमाणात मासळी न मिळाल्यामुळे मच्छिमारांच्या डोक्यावरील कर्ज वाढत आहे. यासाठी राज्य शासनाने मासळीचा दुष्काळ जाहीर करून समुद्र किनारी राहणाऱ्या मच्छिमारांना दिलासा देण्यासाठी कोकण पॅकेज जाहीर करावे अशी जाहीर भूमिका सागर कन्या मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष व कोळी समाजाचे माजी अध्यक्ष मनोहर गजानन मकु यांनी केली आहे.

या वेळी त्यांच्या समवेत जगदीश बोरजी, संदीप चोगले, गजानन कुलाबकर, रोहित फेंगडू व रुपेश पेरेकर आदी मान्यवर उपस्थित होते. मनोहर मकु यांनी कोळी समाजाची व्यथा मांडताना सांगितले कि, कोळी समाजात सुद्धा सुशिक्षित तरुणांची संख्या वाढत आहे. परंतु नोकरी मिळत नसल्याने मजबुरीने मासळी व्यवसायात पडावे लागत आहे. मागील तीन वर्षाची परिस्थीती पहाता मच्छिमार मासळी मिळत नसल्याने खूप बेजार झाले आहेत.

खोल समुद्रात बोटी आठ दिवस मासेमारी करीत असतात, परंतु मोठ्या प्रमाणात मासळी मिळत नसल्याने मच्छिमारांच्या डोक्यावरील कर्ज वाढत आहे.

यासाठी राज्य शासनाने मच्छिमारांची हि परिस्थिती लक्षात घेऊन कोकणात समुद्र किनारी राहणाऱ्या मच्छिमारांना दिलासा देणे खूपच आवश्यक आहे. यासाठी कोकण पँकेज अथवा एखादी वेगळी योजना आणून समुद्र किनारी राहणाऱ्या मच्छिमारांना मोठा दिलासा द्यावा. पावसाळ्यात जून ते ऑगस्ट या तीन महिन्यात मासेमारी बंद असते अश्यावेळी कोळी समाजास उदरनिर्वाह करण्याचा मोठा कठीण प्रसंग निर्माण होतो.

या पावसाळी कालावधीसाठी कोळी समाजाला खावटी योजना मंजूर करावी जेणेकरून संपूर्ण कोकणातील मच्छिमारांना थोडाफार दिलासा मिळू शकतो. आज मासळी व्यवसायामुळे केंद्र शासनास परकीय चलन मिळत आहे. त्यामुळे देशाचा रुपयाची पत सुधारत असते संकट समयी कोळी समाजास दिलासा द्यावा अशी प्रमुख मागणी मनोहर मकु यांनी केली आहे.

# नागोठणे सॅटेलाईट रोटरीचे काम स्तुत्य -वैकुंठ पाटील



**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे सॅटेलाईट रोटरी इंटरनॅशनल क्लब, रोहा रोटरी क्लब व डॉ. आर.एन. पाटील यांचे सुरज हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने व सचिन मोदी यांच्या विशेष सहकार्याने शिव गणेशोत्सव मंडळ सभागृहात नुकतेच आरोग्य तपासणी, उपचार व मोफत औषधे वाटप शिबिर झाले. २५० रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, सरपंच सुप्रिया संजय महाडिक, सहाय्यक पो.नि.सचिन कुलकर्णी, सुरज हॉस्पिटलचे डॉ. उदय पाटील, भाजप रा.जि.कार्यकारणी सदस्य मारुती देवरे, रोटरी क्लबचे सचिन मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा असून नागोठणे रोटरी क्लबचे काम कौतुकस्पपद आहे, असे गौरव उदगार भाजप उप जिल्हाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी काढले तसेच त्याने सांगितले की, सचिन मोदी हा कोहिनूरचा हिरा आहे त्याच्या प्रकाशझोतात असे अनेक समाजोपयोगी कार्यक्रम होत राहतील.

ते पुढे म्हणाले की, आज विविध प्रकारचे आजार वाढत असून त्यामधून व्यायामपटूही सुटत नाहीत. त्यामुळे आपली नियमित तपासणी करणे महत्वाची असून त्यासाठी अशा शिबिरांची आवश्यकता नक्कीच आहे. आज सचिन मोदी यांनी क्लबच्या माध्यमातून हे शिबिर घेऊन महत्वाचे काम केले आहे. आपल्या आरोग्यासाठी शिबीर व सरकारी योजनेचा फायदा घेण्याचे आवाहन करून नागोठणे येथे भव्य रुग्णालयाची आवश्यकता तसेच येथील सरकारी रुग्णालयाची सुधारणा करणे गरजेचे असल्याचे शेवटी पाटील यांनी सांगितले.

डॉ.सुनील पाटील यांनी आपल्या आरोग्याची काळजी आपणच घेतली पाहिजे, तर डॉ.उदय पाटील यांनी कोणीही वंचित न राहता आरोग्यासाठी सरकारी योजनेचा लाभ घ्या, असे सांगितले. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांनी या धकाधकीच्या जीवनात आरोग्य सांभाळा. शरीरासाठी व्यायाम व सकस आहार हा उत्तम उपाय आहे, असे म्हटले.

आपल्या प्रस्तावनेत सचिन मोदी यांनी अशा शिबिराची आपल्या विभागात गरज असल्याचे सांगून अशा प्रकारचे शिबीर सतत भरविणार असून रुग्णांची सेवा करणार असल्याचे सांगितले.

या वेळी नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक, भाजपा जि.उपाध्यक्ष श्रेया कुंटे, ता.सरचिटणीस आनंद लाड, गडब सरपंच मंगेश पाटील, प्रियदर्शनी संस्थेचे अध्यक्ष सिराज पानसरे, ग्रा.पं. सदस्य अमृता महाडिक, विणा मोदी, नागोठणा रोटरी क्लबचे डॉ. सुनील पाटील, डॉ.रोहिदास शेळके व गौतम जैन, डॉ. अभिषेक शहासने, अवि गोळे, निलेश सोलंकी, धीरज मोदी, मांगीलाल चौधरी तसेच रुग्ण व नागरिक उपस्थित होते.

शिबिराला रोहा रोटरी क्लबचे राजू पोकळे, विक्रम जैन, सुरेंद्र निंबाळकर यांनी भेट दिली. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता क्लबचे पदाधिकारी सदस्यांनी तसेच रुग्णालयाचे डॉक्टर व कर्मचारी यांनी अपार मेहनत घेतली.



**कर्जत : भाजप रायगड जिल्हा सरचिटणीस दिपक बेहरे यांची कन्या ॲड. वेदांगी व ॲड. चंद्रकांत महेश वैद्य यांच्या विवाह प्रित्यर्थ भाजप खालापूर तालुका प्रभारी अध्यक्ष सनी यादव, उपाध्यक्ष विठ्ठल मोरे , अध्यात्मिक आघाडी रायगड जिल्हा संयोजक काशीनाथ पारठे, कर्जत विधानसभा युवा मोर्चा संयोजक प्रसाद पाटील, खालापूर शहर अध्यक्ष दिपक जगताप, वाहतूक सेल तालुका अध्यक्ष हरिभाऊ जाधव, संजय म्हात्रे यांनी उपस्थित राहून वधू- वरास आशीर्वाद दिले.**

## विद्यार्थ्यांसाठी मोफत सेमिनार

**माणगाव :** रोटरी इंग्लिश मिडीयम स्कुल खेड आणि एस.एस.निकम इंग्लिश स्कुल माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी आणि पालकांच्या आग्रहास्तव माणगाव आणि इंदापूर येथील विध्यार्थ्यांसाठी मोफत मार्गदर्शनपर सेमिनार कुणबी भवन हॉल.निजामपूर रोड,माणगाव याठिकाणी रविवार दि.९ मार्च रोजी सकाळी १० वाजता आयोजीत केले आहे या सुवर्ण संधीचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी एस.एस.निकम इंग्लिश स्कुल मध्ये संपर्क साधावा.



**रेवदंडा : महाराष्ट्र भूषण तिर्थरूप डॉ. मा. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात अभूतपूर्व काम करणारे ज्येष्ठ निरुपणकार रायगडभूषण सचिनदादा धर्माधिकारी यांना वाढदिवसानिमित्त अलिबाग मुरूडचे आमदार महेंद्र दळवी यांनी रेवदंडा येथे निवासस्थानी भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी त्यांच्यासोबत आशिष भट, हर्षल पाटील, तसेच अलिबाग तालुका प्रमुख अनंत गोंधळी हे उपस्थित होते.**

# मध्य रेल्वेच्या ११ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार



**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकाच्या विस्तार आणि पुनर्बांधणी दरम्यान उत्कृष्ट काम केल्याबद्दल महाव्यवस्थापकांनी महिला अभियंतासह मध्य रेल्वेच्या ११ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार प्रदान केले.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे ४ मार्च रोजी झालेल्या कार्यक्रमात मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्म वीर मीना यांनी ११ मध्य रेल्वे कर्मचाऱ्यांना संरक्षा पुरस्कार प्रदान केले, ज्यात मुंबई विभागातील ४, पुणे विभागातील ३, सोलापूर विभागातील २, भुसावळ विभागातील १ आणि नागपूर विभागातील १ कर्मचारी यांचा समावेश होता.

२४ कोच गाड्या सामावून घेण्यासाठी सीएसएमटी प्लॅटफॉर्म क्रमांक १२/१३ च्या प्लॅटफॉर्म विस्तार आणि पुनर्बांधणीच्या कामात समर्पित कार्य आणि उत्कृष्ट योगदानाबद्दल कल्याण येथील सिग्नल आणि टेलिकम्युनिकेशन (बांधकाम) येथील कनिष्ठ अभियंता .साक्षी गुप्ता यांचाही महाव्यवस्थापकांनी सन्मान केला. त्यांना पदक, प्रशंसा प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

गेल्या काही महिन्यांत कर्तव्यादरम्यान संबंधित कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या सतर्कतेबद्दल, अनुचित घटना रोखण्यात आणि रेल्वे वाहतुकीत सुरक्षितता सुनिश्चित करण्यात दिलेल्या योगदानाबद्दल सुरक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रत्येक पुरस्कारात पदक, प्रशंसा प्रमाणपत्र, अनुकरणीय सुरक्षा कार्यासाठी प्रशस्तिपत्र आणि २००० रुपये रोख बक्षीस समाविष्ट आहे.

पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांमध्ये मुंबई विभागात एस. त्रिनाथ राव, मोटरमन पनवेल, अजब जंगलू बांते, मोटरमन कल्याण, प्रियांशु, कनिष्ठ अभियंता (विज्ञान आणि तंत्रज्ञान) दादर, रुपाली कदम, हेड कॉन्स्टेबल, जीआरपी वडाळा रोड रेल्वे पोलिस स्टेशन, पुणे विभागात सुदर्शन कुमार, लोको पायलट (माल) मिरज, सतीश कुमार प्रजापती, लोको पायलट (माल) घोरपडी, एस.आर.पठारे मोटरमन, सोलापूर विभागात सोलापूर येथील मारतूर येथील सब स्टेशन मॅनेजर मनीष राज, कुमार अमन राज, लोको पायलट (माल) वाडी, भुसावळ विभागात श्याम वाघमारे, वरिष्ठ विभाग अभियंता, पीडब्ल्यूआय, नागपूर विभागात विकास कुमार, पॉइंट्समन दीपोरी, पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करताना आणि कर्तव्यांप्रती असलेल्या त्यांच्या सतर्कतेचे आणि समर्पणाचे कौतुक करताना महाव्यवस्थापक धर्मवीर मीना म्हणाले की, अशा सतर्कता आणि शौर्याच्या कृतींमुळे इतरांना प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी मालमत्तेचे आणि रेल्वे मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी प्रामाणिकपणे काम करण्याची प्रेरणा मिळेल.

# रोह्यातील कलिंगडांचे उत्पादन धुळीस; शेतकरी चिंतेत

## निकृष्ट बियाण्याची चौकशी करावी शेतकरी नेते अनंता मगर यांची मागणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या कलिंगड शेतीतील फळांची वाढ झाली नाही व पूर्णता पांढरा चप्पा पडल्यामुळे जवळपास ९० ते ९५ टक्के पीकाचे नुकसान झालेला आहे. टाकलेला खर्च सुद्धा या उत्पादनातून निघू शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे येथील शेतकरी मोठ्या अडचणीत पडलेले आहेत अनेक शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू दिसत आहेत त्यामुळे येथील शेतकऱ्यांनी प्रशासनाने तात्काळ भेट देऊन पंचनामा करून मदत मिळावी, अशी मागणी देखील येथील शेतकरी करीत आहेत.

रोहा तालुक्यातील वाशी, लांढर, तळाघर, बोरघर गावातील अनेक शेतकरी वर्षाने वर्ष कलिंगडचे उत्पादन घेत आहे. येथील शेतकऱ्यांचे कलिंगड हे आता परदेशी ही जातात. प्रामुख्याने येथील शेतकरी सिबा, शुगर किंग , जिगणा गोल्ड व गोल्डन अशा जातीचे कलिंगडे पिक घेतले आहे.



वाशी गावातील युवा शेतकरी प्रणित सोपान रटाटे यांनी पाच एकरामध्ये कलिंगडची लागवड केली होती . यासाठी त्यांनी जवळपास अडीच लाख रुपये खर्च केले होते मात्र या पिकाचे ९५ % नुकसान झालेला आहे . बोरघर येथील ज्ञानदेव भगत यांनी १० एकर जागेमध्ये कलिंगड लागवड केली होती अंदाजे पाच ते साडेपाच लाख रुपये खर्च केले होते मात्र या पिकाचे ९० टक्के नुकसान झालेल्या . बोरघर येथील विवेक बामुगडे , पाच एकर जमीन लागवड , खर्च ३ लाख ,पिकांचे ९५ नुकसान झाले आहे. वाशी येथील मंगेश बाकाडे ३ एकर जागेत लागवड, २ लाख खर्च, नुकसान ९५ टक्के. तळाघर चंदकांत शेलके १० एकर लागवड, खर्च चार लाख रुपये तर नुकसान ६० ते ७० टक्के. बोरघर व तळाघर येथील सन्मेश सुटे व ऋषिकेश माने या दोन युवा शेतकऱ्यांनी ५ एकर जमीनीवर लागवड केली होती. खर्च तीन ते चार लाख रुपये व नुकसान ८० ते ८५ टक्के झालेले आहे. लाढंर येथील मेगश भगत १० एकर जमीन लागवड, खर्च ५ लाख नुकसान ९० टक्के नुकसान झालेला आहे त्यामुळे येथील शेतकरी



थेट प्रशासनाला आव्हान केलेला आहे तात्काळ पंचनामा करून शासनाने मदत करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. या वर्षी चालू हंगामातील अनेक शेतकऱ्यांचे कलिगड पिक हे पूर्णता वाया गेलेला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे शेतकऱ्यांना मिळालेले बियाणं निकृष्ट दर्जाचे असल्यामुळेच शेतकऱ्यांचे कलिंगड उत्पादन निघू शकलेला नाही. प्रामुख्याने या विभागात दोन टप्प्यात येथे कलिंगडची लागवड करण्यात आलेली आहे मात्र दुसऱ्या टप्प्यातील म्हणजे मार्च महिन्यात आता तोंडाशी आलेले फळाची वाढ झाली नाही. फळावर चप्पा पडलेला आहे

निकृष्ट दर्जाची बियाणं या तालुक्यातील दुकानदारांना दिलेले आहेत. अनेक नामांकित कंपन्यांचे येथील शेतकऱ्यांनी बियाणे वापरले असतानासुद्धा शेतकऱ्याला अडचणीचा सामना करावा लागत आहे त्यामुळे अशा दुकानदारांची चौकशी व्हावी व ती चौकशी पारदर्शक असावी अशा कंपन्या विरोधा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी रोहा तालुक्यातील प्रगतशील शेतकरी तथा शेतकरी संघटनेचे तालुका उपाध्यक्ष अनंता मगर यांनी केलेले आहे.

> **प्रशासन म्हणून नेहमीच शेतकऱ्यांच्या बाजूने आम्ही उभे राहिलेलो आहोत ज्या शेतकऱ्यांच्या मनात शंका असतील तर त्यांनी लेखी स्वरूपात पत्र देऊन चौकशीची मागणी करावी त्याप्रमाणे त्याची चौकशी केली जाईल**
>
> **– महादेव करे, रोहा तालुका कृषी अधिकारी**

## आपण कमवितो त्यातील एक हिस्सा समाज कार्यासाठी दिला पाहिजे - ॲड. धनंजय धारप



**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे लायन्स क्लब आरोग्य, पर्यावरण, सरकारी योजना, नैसर्गिक आपत्ती आदिंसाठी अतिशय उल्लेखनीय काम करत असून त्यांच्या वतीने मोफत मोतीबिंदू शास्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले हे कौतुकास्पद असून आपण कमवितो त्यातील एक हिस्सा समाज कार्यासाठी दिला पाहिजे असा मार्मिक सल्ला श्री बल्लाळेश्वर देवस्थान पालीचे विश्वस्त कमिटीचे माजी अध्यक्ष ॲड. धनंजय धारप यांनी उपस्थितांना दिला.

नागोठणे लायन्स क्लब आयोजित निवृत्त पोलीस अधिकारी बबन कुथे व सावित्री कुथे यांच्या वतीने ला.सुनील कुथे यांच्या सौजन्याने आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटल नवीन पनवेल यांच्या सहकार्याने बुधवार (दि. ५) रोजी आयोजिलेल्या मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीराच्या उदघाटना प्रसंगी मार्गदर्शन करताना ॲड. धनंजय धारप बोलत होते.

यावेळी नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक, ॲड. महेश घायले, ॲड दिनेश वर्मा, लायन्स क्लब अध्यक्ष लायन सुनील कुथे, लायन ॲड. स्मिता कुथे, चार्टड प्रेसिडेंट लायन प्रकाश जैन, झोन चेअरमन एमजेएफ लायन विवेक सुभेकर, लायन्स क्लब उपाध्यक्ष लायन विशाल शिंदे, सेक्रेटरी लायन डॉ.अनिल गिते, ,लायन दौलत मोदी, लायन जयराम पवार , लायन सखाराम ताडकर, लायन सिद्धेश काळे, लायन विद्या म्हात्रे, आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटलचे ॲडमिन विजय बामणे, गीतांजली संवादकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# स्टीव्ह स्मिथची तडकाफडकी निवृत्ती

## टीम इंडियाविरुद्धचा पराभव जिव्हारी लागला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील भारतीय संघाविरुद्धच्या पराभवानंतर स्टीव्ह स्मिथ याने वनडेतून निवृत्तीची घोषणा केलीये. स्टीव्ह स्मिथच्या नेतृत्वाखालील कांगारूंना १४ वर्षांनी भारताने आयसीसी स्पर्धेच्या बाद फेरीत गारद करण्याचा पराक्रम करून दाखवला. दुबईतील या पराभवानंतर स्मिथनं लगेच वनडे कारकिर्दीतून निवृतीतीची घोषणा केली आहे.



कॅप्टन्सीत मोठा डाग लागल्यावर पुन्हा त्याला कॅप्टन्सीचा मान मिळाला होता. पॅट कमिन्सच्या दुखापतीमुळे तो आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत त्याला नेतृत्वाची संधी मिळाली. बॅटिंगमध्ये त्याने आपलं कर्तत्व दाखवलं. पण संघाला जिंकून देण्यात एक कॅप्टन म्हणून तो कमी पडला. भारताविरुद्धच्या पराभवानंतर त्याने हार मानली अन् वनडेला फुलस्टॉप दिलाय.

**वनडे कारकिर्दीतील कामगिरी**

स्टीव्ह स्मिथनं आपल्या वनडे कारकिर्दीत १७० सामन्यात ५८०० धावा केल्या आहेत. यात १२ शतकांची नोंद आहे. तो २०१५ आणि २०२३ वनडे वर्ल्ड कप विजेत्या संघाचा भाग राहिला होता. वनडे कारकिर्दीत १६४ ही त्याची सर्वोच्च धावसंख्या आहे.

स्टीव्ह स्मिथ हा क्रिकेट जगतातील सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक आहे. पण कॅप्टनच्या रुपात त्याला छाप सोडता आली नाही. उलट २०१८ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटीत बॉल टेम्परिंग प्रकरणात त्याच्यासह ऑस्ट्रेलियन संघाची नाचक्की झाली होती. बंदीच्या कारवाईनंतर त्याला कॅप्टन्सीची संधी मिळणे जवळपास मुश्किलच वाटत होते. संधी मिळाल्यावर साखळी फेरीतील दमदार कामगिरीसह त्याच्या नेतृत्वाखालील ऑस्ट्रेलियानं सेमीपर्यंत मजल मारली, पण इथे संघाचा प्रवास संपला. दुबईच्या मैदानातील ऑस्ट्रेलियन संघाच्या प्रवासासोबतच स्मिथची वनडे कारकिर्दही संपली.

# सीकेटी महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगु काना ठाकूर (सीकेटी) कॉलेज (स्वायत्त) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या समन्वयाने आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धा ५ व ६ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे.



या स्पर्धेचे उद्घाटन कॉलेजचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील यांनी केले आहे. तसेच स्पर्धेमध्ये ६ महाविद्यालयातील मुलींच्या चार संघानी व मुलांच्या सहा संघांनी सहभाग नोंदविला आहे. आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये डी.जी. रुपारेल कॉलेज, माटुंगा, चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल, आर. ए. पोतदार कॉलेज, माटुंगा, विवेकानंद कॉलेज, चेंबूर, जी.एन. खालसा कॉलेज, माटुंगा आणि पिल्लई कॉलेज, न्यू पनवेल इत्यादी महाविद्यालये सहभागी झाली आहेत.

स्पर्धेच्या आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नात्ती व प्रा. प्रतिज्ञा पाटील जिमखाना विभागाचे सर्व सदस्यांनी परिश्रम घेत आहेत.

# विराट कोहलीने घडवला इतिहास

## आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक झेल घेणारा खेळाडू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अनेक मोठे विक्रम आपल्या नावे केले आहेत. हे सर्व विक्रम विराटने बॅटने धावा करत आहेत, पण आता किंग कोहलीने क्षेत्ररक्षण करतानाही एक मोठा विक्रम आपल्या नावे केला, जो कोणत्याच भारतीय खेळाडूला आजवर करता आलेला नाही.

विराट हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारताकडून सर्वाधिक झेल घेणारा खेळाडू बनला आहे. त्याने राहुल द्रविडचा विक्रम मोडीत काढला आहे. रवींद्र जडेजाच्या चेंडूवर जोश इंग्लिसचा झेल घेत विराटने ही कामगिरी केली. टीम इंडियाच्या स्टार फलंदाजाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आतापर्यंत ३३६ झेल घेतले आहेत.



उपांत्य फेरीसारख्या मोठ्या सामन्यात विराट कोहलीने ऑस्ट्रेलियाचा यष्टिरक्षक फलंदाज जोश इंग्लिसचा झेल घेत मोठी कामगिरी आपल्या नावे केली. विराटने जागतिक क्रिकेटमध्ये पुन्हा एकदा खळबळ उडवून दिली. विराटने आपल्या ५४९व्या सामन्यात भारतासाठी सर्वाधिक झेल टिपण्याची ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

अलीकडेच विराट एकदिवसीय सामन्यांमध्ये भारतासाठी सर्वाधिक झेल घेणारा खेळाडू ठरला होता, तर आता तो सर्व फॉरमॅटमध्ये ही कामगिरी करणारा भारतीय खेळाडू आहे. राहुल द्रविने आपल्या कारकिर्दीत एकूण ५०४ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आणि एकूण ३३४ झेल घेतले.

मोहम्मद अझरुद्दीनला मागे टाकत कोहलीने नुकताच वनडेमध्ये भारतासाठी सर्वाधिक झेल घेण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे.

## विराटचे अर्धशतकासह एका डावात दोन विक्रम

**दुबई :** ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या सेमी फायनलमध्ये विराट कोहलीने दमदार खेळीचा नजराणा पेश केला. आयसीसीच्या स्पर्धेत सर्वाधिक फिफ्टी प्लसचा सचिन तेंडुलकरचा रेकॉर्ड त्याने मागे टाकला आहे. एवढेच नाही, तर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अर्धशतकासह किंग कोहलीने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेच्या इतिहासात सर्वाधिक धावा करण्याच्या शर्यतीत शिखर धवनचा विक्रमही मागे टाकला.

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारताकडून सर्वाधिक ७०१ धावांचा रेकॉर्ड हा शिखर धवनच्या नावे होता. आता भारताचा किंग या यादीत टॉपला पोहचला. दुसरीकडे आयसीसीच्या वनडे स्पर्धेत सर्वाधिक वेळा २४ वेळा ५०पेक्षा अधिक धावा करण्याचा विक्रम त्याने मोडीत काढला. सचिनने ५८ डावात २३ वेळा ही कामगिरी केली होती. विराटने ५३ डावात २४व्या वेळी फिफ्टी प्लस धावा करत नवा रेकॉर्ड सेट केलाय.

# वुशू क्रीडा स्पर्धेत राकेश बेदीला 'सिल्वर'

**उरण : बातमीदार**



आयएनएस टुनिर (भारतीय नौदल) उरण येथील अग्निशमन मुख्यालयातील नागरी संरक्षण कर्मचारी राकेश बेदी यांनी अथेन्स ग्रीस येथे २०२५ मध्ये संपन्न झालेल्या ॲक्रोपोलिस आंतरराष्ट्रीय वुशू स्पर्धेत भाग घेउन सिल्व्हर मेडल मिळवत भारताचे नाव उंचाविले आहे.

राकेश मनोज बेदी हे राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय वुशू, जु-जित्सू आणि ज्युडो खेळाडू आहेत. अलिकडेच ग्रीसमधील अथेन्स शहरात झालेल्या ॲक्रोपोलिस आंतरराष्ट्रीय वुशू चॅम्पियनशिप २०२५ साठी त्यांची निवड झाली होती. या स्पर्धेसाठी भारताचे प्रतिनिधित्व करत राकेश बेदी यांनी इतिहास रचत सिल्वर मेडल प्राप्त केले आहे. त्यांच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

राकेश बेदी यांनी सर्वांचे आभार मानत कृतज्ञता व्यक्त केली आहे. कमांडिंग ऑफिसर, आयएनएस तुनीर, कार्यकारी अधिकारी आयएनएस तुनीर, कमांडर एन राजेश खन्ना, लेफ्टनंट कमांडर शाहीन हुसेन, सुहेल अहमद (वुशू इंडिया), अनिकेत अनिल कुडाले, जयपाल सिंग नेगी, स्टेशन ऑफिसर एम बी थळी, सुनील गुर्जर, कुलदीप सिंग, जयराज पी जयकुमार, गणेश डी पाटील (कोटनाका), बलराज पानसरे, एच बी पाटील, आशिष गोवारी, सागर चौहान, अनिता लांजेवार सतीश म्हात्रे, सुजाता गजकोश, सुमन कुमारी,श्रीकांत भगत, भारती म्हात्रे, सीई विभाग, सागर चव्हाण, प्रशिक्षक किलमन पाउलो फर्नांडिस आणि वेस्टर्न नेव्हल कमांड (भारतीय नौदल), वुशू असोसिएशन ऑफ इंडिया, महाराष्ट्र जू-जित्सू असोसिएशन या सगळ्यांनी दिलेल्या सर्व सहकार्याबद्दल राकेश बेदी यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. राकेश बेदी हे एक चांगले आणि वुशू, ज्युडो/जु-जित्सू(थलीट),भारतीय नौदल आणि महाराष्ट्रचे प्रतिनिधित्व करणारे उत्तम खेळाडू आहेत.त्यामुळे भारताला एक उत्तम खेळाडू मिळाल्याने भारताचे नाव आता सातासमुद्रापलीकडे गेले आहे.

# ना पाकिस्तान फायनलमध्ये, ना फायनल पाकिस्तानमध्ये

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचा यजमान देश असूनही पाकिस्तान साखळी फेरीतच बाहेर पडला. त्यात भरीस भर म्हणून आता भारत अंतिम फेरीत पोहोचल्यामुळे अंतिम सामनादेखील पाकिस्तानमध्ये होणार नसल्याचं स्पष्ट झालं. यावरून सोशल मीडियावर तुफान मीम्स व्हायरल होत आहेत.

पाकिस्तानचा संघ साखळी सामन्यातच स्पर्धेतून बाहेर पडल्यामुळे अशा प्रकारे पहिल्याच फेरीत बाहेर पडणारा पहिला देश म्हणून पाकिस्तानच्या नावे नकोसा विक्रम प्रस्थापित झाला आहे. पण त्यामुळे किमान यजमान म्हणून स्पर्धेचा अंतिम सामना देशात खेळवला जावा, यासाठी पाकिस्तानमधील क्रिकेट चाहते व क्रिकेटपटू अपेक्षा व्यक्त करत होते. पण आता भारताच्या विजयामुळे त्यांच्या या आशा धुळीस मिळाल्या असून आता



स्पर्धेचा अंतिम सामनाच यजमान देशातून बाहेर गेल्याची दुहेरी नामुष्की पाकिस्तानवर ओढवली आहे.

पाकिस्तानवर ओढवलेल्या या नामुष्कीमुळे सोशल मीडियावर मीम्स व्हायरल होत आहेत. एका युजरनं के. एल. राहुलनं मारलेल्या शेवटच्या विजयी षटकाराचा व्हिडीओ शेअर केला आहे. त्यावर एकाच सामन्यात ऑस्ट्रेलिया व पाकिस्तान या दोघांचा पराभव करणं ही वेगळीच बाब आहे, अशी पोस्ट लिहिली आहे.

एका युजरनं पाकिस्तानमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा अंतिम सामना होणार नसल्यामुळे दोन मिनिटांचं मौन पाळण्याचं आवाहन लोकांना केलं आहे.

एका युजरनं एका दाक्षिणात्य चित्रपटातील एका सीनचा व्हिडीओ शेअर केला आहे. त्यात एक लहान मूल रागाने आणि साश्रूनयनांनी समोर पाहात असल्याचं दिसत आहे.

### सोशल मीडियावर मीम्सचा पूर!

यावर 'पाकिस्तान यजमान असताना चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचा अंतिम सामना दुसऱ्या देशात खेळवला जात असताना पाहणारे पाकिस्तानी नागरिक', अशी पोस्ट लिहिली आहे.

एका युजरनं तर 'ना पाकिस्तान फायनलमध्ये, ना फायनल पाकिस्तानमध्ये', अशी पोस्ट करत त्यासोबत शोएब अख्तरचा एका टीव्ही शोमधला व्हिडीओ शेअर केला आहे. पाकिस्तानच्या नामुष्कीजनक कामगिरीमुळे पाकिस्तान क्रिकेटबाबत सर्वांगीण चर्चा व बदलांबाबत मोठे निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# क्रिकेट स्पर्धेत दिवा कोळीवाडा, ऐरोली संघ विजेते

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका महापालिका चषक ४०+ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने बेलापूर येथील मैदानावर करण्यात आले होते. या स्पर्धेत ४०+मध्ये दिवा कोळीवाडा संघाने, तर शहरी विभागात युनायटेड स्पोर्ट्स ऐरोली संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत ४०+ क्रिकेट असोसिएशनच्या सहकार्याने व त्यांच्याकडील नोंदणीकृत गावकीमधील ३३ आणि शहरी २४ अशा दोन गटात एकूण ५७ संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचा शुभारंभ वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आला. स्पर्धा तीन दिवस बाद पद्धतीने खेळवण्यात आली.

४०+मध्ये अंतिम फेरीचा सामना खारीगाव आणि दिवा कोळीवाडा या दोन संघात झाला, ज्यात दिवा कोळीवाडा संघाने खारीगाव संघास नमवत विजेतेपद पटकाविले. शहरी गटात अंतिम सामना युनाटेड स्पोर्ट्स



ऐरोली आणि एसडी इलेव्हन नेरूळ या दोन संघात झाला. यात ऐरोली संघाने बाजी मारत विजेतेपदाला गवसणी घातली.

गावकी विभागात मालिकावीर म्हणून प्रेमानंद केणी, उत्कृष्ट फलंदाज जनार्दन कवळे , उत्कृष्ट गोलंदाज संदीप पाटील, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक सोमनाथ पाटील यांना गौरविण्यात आले.

शहरी विभागात मालिकावीर म्हणून मारको-युनायटेड स्पोर्ट्स ऐरोली, उत्कृष्ट फलंदाज फिरोज खान एसडी इलेव्हन नेरूळ, उत्कृष्ट गोलंदाज राजू युनायटेड प्लस, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक दत्ता मोहिते युनायटेड प्लस ऐरोली यांचा गौरव करण्यात आला.

प्रमुख अतिथी म्हणून नवी मुंबई महापालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभाग उपायुक्त अभिलाषा पाटील, ४०+ क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप पाटील, उपाध्यक्ष नरेश गौरी, खजिनदार मनोज म्हात्रे, शहरी उपाध्यक्ष सुरेश राणाजी, सचिव विकास मोकल यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.

# गोवठणे संघाने सीएचए आधार चषक जिंकला

**उरण : बातमीदार**

न्हावाशेवा सीएचए आधार सामाजिक संस्थेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही सीएचए आधार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १४१६ वॉरियर्स, गोवठणे या संघाने विजेतेपद पटकाविले.

पिरकोन येथील धोंडूकाका मैदानात स्पर्धा खेळविण्यात आल. स्पर्धेला आमदार महेश बालदी, कामगार नेते महेंद्र घरत यांच्यासह विनोद म्हात्रे, रूपेश पाटील, राजू मुंबईकर, नरेंद्र मुंबईकर, सत्यवान भगत, धनंजय म्हात्रे, डॉ. हिराचंद पाटील, परेश ठक्कर, विनायक अपराज, भारत भोपी, जीवन म्हात्रे, मुकुंद गावंड, अजित म्हात्रे, देवेंद्र पाटील, गुरूराज ठाकूर, शशिकांत पाटील, मंगेश म्हात्रे, सुदेश पाटील आदींनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

द्वितीय क्रमांक साई भोळा इलेव्हन (आवरे) संघाने प्राप्त केला. या क्रिकेट स्पर्धेतून मिळणारी सर्व रक्कम सामाजिक कार्यासाठी वापरली जाणार आहे.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com